# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १०९**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • मेलखा • ठाणे

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष सातवे / अंक १० / सप्टेंबर २००६

## संपादकीय

## संगणकीकृत प्रवेश प्रक्रिया

विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयांतील प्रवेशांच्या दृष्टीने यंदा परिवर्तन करण्यात आम्ही आघाडी मिळविली आहे. कागदाचा वापर न करता संगणकाच्या आधारे सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रवेश यशस्वीपणे करणारी महाराष्ट्रातील पहिलीच संस्था ठरण्याचा मानही विद्या प्रसारक मंडळाने मिळवला आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. १९९५ पासूनच संगणकाचा वापर व्यापक स्वरूपात आम्ही चालू केलेला असला, दहा एकर परिसरात फायबर ऑप्टिक्सचा वापर करून नेटवर्क तयार केले असले तरी प्रवेशाचे पूर्ण संगणकीकरण यावर्षी झाले.

यावर्षी एकही छापील प्रवेश पत्र विकले गेले नाही. छापील प्रवेश अर्ज नसल्यामुळे मोठाल्या रांगा लावून वेळेचा अपव्यय करण्याची गैरसोयही टळली. पालक व विद्यार्थी यांच्या लांबच लांब रांगा हे प्रतिवर्षी दिसणारे चित्र यावर्षी नव्हते. प्रवेश मिळवून देतो असे सांगून विद्यार्थ्यांना फसविणारी समाज विघातक प्रवृत्तीही या संगणकाधारित प्रवेशामुळे बंद झाली.

संगणकाच्या आधारे, संगणकाचा व इंटरनेटचा वापर करून विद्यार्थी प्रवेश अर्ज दाखल करतात व ते ही १२-१४ हजार विद्यार्थी, ही देखील आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. घरोघर संगणक नाहीत, इंटरनेट नाहीत, विद्यार्थी संगणक साक्षर नाहीत असे म्हणणाऱ्यांनी तर आवर्जून या गोष्टीची दखल घ्यावयास हवी. घरात संगणक संच नसतील तर सायबर कॅफेत जाऊन विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. संगणक साक्षर नसणाऱ्या पालक विद्यार्थ्यांनी इतरांच्या मदतीने अर्ज भरले. याचा अर्थ ''संगणक साक्षरता नाही'' हा आता भूतकाळ ठरणार आहे.

प्रचंड मोठ्या प्रमाणात कागदाची बचत झाली, अनावश्यक रकान्यांसह कार्यालयात भरून आलेले अर्ज सांभाळत बसण्याचे काम वाचले हे फायदे तर झालेच, पण विद्यार्थ्यांनी व पालकांनी स्वत: माहिती भरलेली असल्याने माहितीची विश्वासार्हता अधिक वाढली. बिनचूक माहिती महाविद्यालयांकडे आल्याने गुणवत्ता यादी तात्काळ तयार झाली. पूर्वी पारंपरिक पद्धतीत गुणवत्ता यादी बनविण्यात प्रशासनाचा व संबंधित अध्यापकांचा वेळ खर्ची पडे. आता त्या वेळेचीही बचत झाली. शिवाय सर्व माहिती इंटरनेट वर उपलब्ध असल्याने प्रत्येकजण प्रक्रियेची सत्यासत्यता पडताळून पाहू शकत होता. त्या दृष्टीने तर प्रवेश प्रक्रियेत कोणतीही गुप्तता न राखता ती परिपूर्ण व पारदर्शक बनली. इतक्या मोठ्या कामाला एरवी पुष्कळ वेळ लागत होता, विद्यार्थी व कर्मचारी यांच्यात विसंवाद निर्माण होण्याच्या शक्यता असायच्या. संगणकाच्या वापरामुळे हे सर्व टळले आहे व एकूण प्रक्रियेत गतिमानता आणण्यात आम्हाला यश आले. यावर्षी संगणकीकृत प्रक्रियेत राहिल्या असतील त्या त्रुटी आता पुढील वर्षी आम्ही निश्चित दूर करू शकू याचा विश्वास आम्हाला वाटतो.

विद्या प्रसारक मंडळाच्या या प्रवेश पद्धतीचा वस्तुपाठ इतर महाविद्यालयांनीही गिरविला तर प्रवेशासंबंधित समस्या दूर सारण्यास निश्चितच यश मिळेल.




वर्ष सातवे / अंक १० / सप्टेंबर २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ३ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | गीता आणि मी | डॉ. मो. दि. पराडकर | ३ |
| २) | वेदान्त आणि आधुनिक विज्ञान | शं. बा. मठ | ५ |
| ३) | विद्यापीठ - प्रतिष्ठान | डॉ. प्रभाकर आपटे | ९ |
| ४) | मंगळा गौर जागविण्याच्या निमित्ताने | सौ. सुमेधा बेडेकर | १४ |
| ५) | कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा - धावता दृष्टिक्षेप | मोहन पाठक | १८ |
| ६) | ग्रेड परीक्षांचे बदलते रूप | मंजिरी दांडेकर | २४ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# गीता आणि मी

*भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रस्थान त्रयीपैकी एक असलेल्या गीतेचे आपल्या जीवनातील स्थान व महत्त्व याविषयी माननीय डॉ. मो. दि. पराडकर यांनी व्यक्त केलेले हे विचार. - संपादक*

गीतेचा माझा जाणीवेच्या वयापासूनच संबंध यावा हा पूर्वजन्मीचा संकेत असावा. माझा जन्म आर्यापती कवी मोरोपंत पराडकरांच्या वंशातला. तथापि माझे बालपण परभणीला. ती. गोविन्दराव नानल यांच्या घरात गेले. आम्ही मुले त्यांना धाकटे आजोबा म्हणत असू. त्यांचे वडील भाऊ पार्थिव पूजा करताना उत्तम गात असत. धाकटे आजोबा निष्णात वकील आणि स्वर्गीय गायक संत भटजी बापू यांचे दीक्षित शिष्य असल्यामुळे घरातच नियमित गीतापाठ होत असे. संगीताच्या अंगाने म्हटले जाणारे गीतेचे अध्याय नेहमीच कानांवर पडत होते. त्या वेळी म्हणजे सुमारे ७० वर्षांपूर्वी घरातला सर्वात लहान मुलगा म्हणून माझे आजोबांना मोठे कौतुक! यामुळे वयाच्या पाचव्या वर्षी शारदोत्सवासाठी म्हणून त्यांनी माझ्याकडून २७ श्लोकांचा गीतेतला १५वा अध्याय पाठ म्हणून घेतला. अर्थ त्यावेळी कळणे शक्य नव्हते परंतु उच्चारण स्वच्छ होते आणि वयानुसार जे येते ते घडाघड म्हणून दाखवायची हौसही होती. तसे पाहिले तर उच्चारणांतली शुद्धताही बरीचशी अनुवांशिक। परन्तु लोकांच्यावर प्रभाव पडला आणि धाकट्या आजोबांनी बक्षीस म्हणून एक चांदीचा बिल्ला शारदोत्सव समितीकडून माझ्या गळ्यात घातला. तो मी अद्यापि जपून ठेवलेला आहे, माझ्या शैशवातली गीतेची आठवण म्हणून.

गीता मुखोद्‌गत असावी हा संकेत दोन्ही घराण्यांत असल्यामुळे गीता माझ्या नित्यपठणात रहावी यात नवल नाही. आजही मी रोज गीतेचे ३ अध्याय म्हणतो. शालेय जीवनातही मी दररोज गीतेचा कधी एखादा तर कधी दोन अध्याय पाठ म्हणत असे. एकदा ज्या चाळीत आम्ही रहात होतो त्यातल्या शारदोत्सवात मी गीतेचा अकरावा अध्याय (हा मोठ्या अध्यायांपैकी एक ७२ श्लोकांचा) म्हणून दाखवला, लोकांना नवल वाटले! पाठांतरही सवयीने वाढते. अर्थ कळल्यानंतर तर ते अधिकच सोपे परंतु हे मलाही उशीरानेच कळले! शालेय जीवनांतच माझे १५ अध्याय पाठ झाले होते. १६व्या अध्यायाचा पहिला श्लोक पंढरपूरला पंतांच्या वाड्यात माझे चुलत आजोबा भय्यापंत पराडकर यांनी शिकवून पाठ म्हणून घेतला.

परळच्या रामचंद्र भट हायस्कूलमधून मॅट्रिक होण्यापूर्वीच गीतेचे १८ अध्याय माझ्या तोंडात बसले होते. याचेही माझ्या तत्कालीन शिक्षकांना मोठे कौतुक होते आणि ते कायम रहावे म्हणून माझे गीतेचे पाठांतर सतत ताजेतवाने ठेवण्याचे पत्करले होते. या शिक्षकांच्या कौतुकात आमच्या शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक श्री. मो. वा. दोंदे यांच्या प्रोत्साहनाचा हा भागही महत्त्वाचा. हे माझे सर पुढे मुंबईचे महापौर झाले. पाठांतरामुळे व गीतेवरील प्रेमामुळे माझे त्यांच्याशी असलेले संबंध कायम राहिले. परंतु यातही माझ्या गीता स्मरणाचा भाग आहेच.

पुढे महाविद्यालयीन अभ्यासक्रमात मी संस्कृत हा विशेष विषय म्हणून निवडल्यामुळे तर बी.ए. साठी गीतेचा मला अभ्यास करावा लागला असे म्हणण्यापेक्षा मी तो अधिक हौसेने केला असे नमूद करणे योग्य. यामुळे माझ्या सहाध्यायांमध्ये मला विशेष मान मिळत गेला. योगायोगाने बी.ए. च्या परीक्षेत (सन १९४५) गीतेच्या प्रश्नपत्रिकेत जो एक प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर तत्कालीन भाषांतरातून मिळण्यासारखे नसल्यामुळे त्यांनी त्या प्रश्नाला

'पराडकरच त्याचे उत्तर आपल्या पाठांतराच्या जोरावर ऐन वेळी लिहू शकतो' असे उद्‌गार काढले आणि ते खरेच होते. मला ८०% गुण मिळाले होते.

पुढे 'गीता' ही भारताच्या तत्त्वज्ञानाच्या 'प्रस्थान त्रयी' पैकी एक आहे आणि त्यामुळे भारतातील सर्व आचार्यांना गीतेवर भाष्ये लिहून आपल्या तत्त्वज्ञानाला गीतेचा दुजोरा आहे हे का सांगावे लागले याचे रहस्य लक्षात आले. प्रत्येक व्यक्तीने आपल्या वाट्याला आलेले काम निरलसपणाने करीत रहावे (नियतं कुरु कर्मत्वम्) प्रसंगी प्राप्त झालेल्या यशामुळे हुरळून जाऊ नये आणि विशेष म्हणजे जीवनात अपरिहार्यपणे येणाऱ्या संकटांमुळे खचून जाऊन 'युध्यस्व विगतज्वर:' हा बाणा सोडून देऊ नये ही मोलाची शिकवण गीताच देऊ शकते हे अनुभवले. विद्यार्थी जीवनात मुंबईत रहावयाला घर नसल्यामुळे त्रिस्थळी यात्रा १२ वर्षे करावी लागली, अध्यापकीय जीवनातही अन्याय झाल्यामुळे महाविद्यालये बदलून दरवेळी 'पुनश्च हरि: ओम' म्हणण्याची पाळी आली आणि एकदा तर स्वाभिमानाच्या रक्षणासाठी सहा वर्षे मुंबईत नोकरीशिवाय काढण्याचा प्रसंग आला, परंतु प्रत्येक वेळी गीतेतल्या वर सांगितलेल्या 'युध्यस्वे' ने धीर दिला आणि तावून सुलाखून निघाल्याने तरही 'विगतज्वर' ने अहंकाराचा उन्माद निर्माण होऊ दिला नाही. इतकेच नव्हे तर 'संकट' ही सुद्धा एक 'संधी'च असते, त्याचा योग्य तो उपयोग करून घेण्याचे प्रोत्साहन देणारी परिस्थिती व प्रत्येक वेळी उत्स्फूर्त साहाय्य देणारे मित्र मिळत गेले; 'य: पलायते स जीवति' असे म्हणण्याचा प्रसंग कधीही आला नाही ही खऱ्या अर्थाने गीतेची म्हणजेच जीवन जगावे कसे' हे अर्जुनाला प्रभावीपणाने सांगणाऱ्या योगेश्वर कृष्णाचीच कृपा. म्हणूनच म्हणतो

यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्ममिर्मम ॥

**डॉ. मो. दि. पराडकर**

### पन्नाशीनंतर प्रत्येक ५ वर्षांनी शांती

भारतीय संस्कृतीत व्यक्तीच्या (स्त्री व पुरुष) वयाला ५० वर्षे पूर्ण होणे हा महत्त्वाचा टप्पा मानलेला आहे. सिद्ध पुरुष हजारो वर्ष जगत. (उदा. चांगदेव, नरसिंह सरस्वती इ.) असा संदर्भ पुराणात व धर्म इतिहासात असला तरी वयाची शंभरी गाठण्याला आपण महत्त्व देतो व आशीर्वादही शतायुषी व्हा असाच देतो. ५० च्या पुढे प्रत्येक टप्प्यावर शौकारी ऋषिंनी अपमृत्यू टाळण्यासाठी वयाची शांती करावयास सांगितली आहे. पहिली शांती ५० व्या वर्षी केली जाते त्यापुढील टप्पे व करावयाच्या शांतीची नावे -

| वय | | शांतीचे नाव |
|---|---|---|
| ५० | - | वैष्णव शांती |
| ५५ | - | वारुणी शांती |
| ६० | - | उग्रस्थ शांती |
| ६५ | - | मृत्युंजय महारथी शांती |
| ७० | - | भीमरथी शांती |
| ७५ | - | ऐंद्री शांती |
| ८० | - | सहस्त्रचंद्र दर्शन शांती |
| ८५ | - | रौद्री शांती |
| ९० | - | कालस्वरूप रौद्री शांती |
| ९५ | - | त्र्यंबक मृत्युंजय शांती |
| १०० | - | महामृत्युंजय शांती |

**संदर्भ - 'संपूर्ण चातुर्मास'**

# वेदान्त आणि आधुनिक विज्ञान

*वेदांचा आणि विज्ञानाचा, त्यातही आधुनिक विज्ञानाचा संबंध आहे काय, असेल तर कसा आहे, याविषयी विचार प्रवृत्त करणारा शंकरराव मठांचा पुढील लेख - संपादक*

## बदलता विचार

पाश्चात्य देशातील सुज्ञ मंडळी सांप्रत तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्या मधे फार मोठी फारकत असल्याचे मानताना आढळत नाहीत. एकाच ज्ञान वंशातील या दोन शाखा आहेत व त्यांचा एकमेकावर अंमल चालत असतो असेच त्यांना वाटते. आज तर आदर्शवाद व वास्तविकता यातील रेषाही नवनवीन विज्ञानाच्या उपपत्तीने पुसट होत चाललेली आहे. कारण विज्ञानालाही तत्त्वज्ञानाशी योग्य जुळवा जुळव करून घ्यावी असे वाटत आहे. आणि आपलाही अंतिम टप्पा सत्यशोधन हाच असल्या बद्दलची जाणीव विज्ञानाला होऊ लगलेली आहे.

## काही वैज्ञानिकांची मते

वरील विधानावर प्रकाश टाकणारी काही वैज्ञानिकांची मते उद्बोधक ठरतील. सर ऑलिव्हर लॉज - आपल्या ''विज्ञान व ईश्वर'' (Science and God) या ग्रंथात म्हणतात, ''संपूर्ण वास्तविकते संबंधी संशोधन केले. त्यावरून मला हे जाणवले की विज्ञान म्हणजे - इह लोकी भौतिक जगतात आम्हास इथे जे काही घडत आहे वाटते तेच सर्वत्र घडत असते आणि सर्वच काही एका सूत्रात बध्द आहे. याचाच अर्थ विश्वात एकात्मता आढळते. आणि विरोधी परस्पर विसंवादी अशी कोणतीच शक्ती नाही.'' या दोन ज्ञानशाखांमध्ये झगडा असलाच तर तो वास्तवता निश्चित करण्या पुरताच असेल.

वेदान्त विषयक विचारांबद्दल असे म्हणावेसे वाटते की हे वेदान्ताचे वैशिष्ट्य मानावे लागेल. कारण वेदान्त्यांनी कधी पासूनच सगळ्या दृश्य जगतातील विसंवाद हा भ्रममूलक असल्याचे जाहीर केले आहे. सर्वप्रथम सत्यते बद्दल ठामपणे जगात विचार प्रस्थापित करणारे, 'अनन्ताचे शास्त्र' प्रतिपादणारे वेदांतीच होत असे त्यांच्याबद्दल गौरवपूर्ण उद्‌गार काढल्यास अप्रस्तुत होणार नाही. अत्यंत कुशलतेने त्यांनी परस्परातील संघर्ष नाहीसा करूना ईश्वर, आत्मा व विश्व यातील शाश्वत संबंध संपूर्ण मनुष्य मानासाठी प्रस्थापित केले आहेत. वेदान्ती म्हणतात, - ''दृश्य विश्वाचे जे काही कारण असेल त्याचेही ईश्वर कारण आहे. हे विश्व मानवी मनाला भावते हे जितके खरे आहे तितकेच हे विश्व त्या शाश्वततलाचेच अत्यंत कुशलतेने अत्यंत कुशलतेने झालेले अभिव्यक्त रूप आहे.''

निर्मिती म्हणजे व्यक्त व अव्यक्त यांची अखंड चालणारी प्रक्रिया व पद्धती होय। व त्यातील सूक्ष्मता हे कारण स्थूलता हे कार्य आहे. आणि ही सर्वांच्या अनुभवाला येणारी गोष्ट आहे. पावसाचा एक थेंब सूर्यप्रकाशात चमकतो. तो थेंब समुद्रातील पाण्याच्या वाफेच्या कणाहून भिन्न नसतो आणि तोच पुन्हा जल बिंदू म्हणून खाली येतो व पुन्हा वाफेचा बिंदू बनतो. याचप्रमाणे सर्व गोष्टींचे परिवर्तन जगतात घडत असते. थोडक्यात स्थूल कार्य-आपल्या सूक्ष्म कारणात जाताना आढळते. वस्तुमानाचा तो नाश त्यांना सूक्ष्मरूप प्राप्त होत असते. असेच मानावे लागते. म्हणजेच या मोठ्या परिवर्तनाच्या शेवटी साऱ्याच जगातल्या गोष्टी आपल्या व्यक्ततेचा त्याग करून आपल्या अव्यक्त सूक्ष्म रूपात जातात. या सर्व व्यक्तते मागे अव्यक्ताचे मूळ-गति, स्पंदन, शब्द व रोधकता- असून तेच जगतात दृश्यरूपाने व्यक्त होत असते.

### उत्क्रान्ती

सांख्य तत्त्वज्ञानातील 'प्रकृती' ती हीच होय. आम्ही तिला निसर्ग वा पदार्थ अशा नावाने ओळखत असतो. प्रलय म्हणजे प्रकृतीची साम्यावस्था होय. त्यावेळी प्रकृतीचे गुणधर्म समपातळीत असतात. कोणी एकमेकावर कुरघोडी करत नाही. प्रकृतीचे तीन गुण असे आहेत. तम-रोधक तत्व, रज-गतिशील तत्त्व, सत्व या दोनही गुणांचे नियमन करणारे तत्त्व. साम्यावस्था नाहीशी होते तेव्हा यातील गुण एकमेकावर कुरघोडी करू लागतात. त्यांच्यात गतिमानता निर्माण होते आणि व्यक्ततेला प्रारंभ होतो. यालाच ईश्वराचा श्वासोच्छ्वास असे श्रुती म्हणते. प्रलयाच्या वेळी जे मूळ कारण असेल त्यात जी सुप्त शक्ती असेल तीच निसर्गाच्या वेळी अभिव्यक्त होत राहते. व तिचेच स्थूल रूप कार्य दृश्य स्वरुपात विश्व म्हणून उभे टाकते. यालाच वैज्ञानिक उत्क्रांती असे म्हणतात. वेदान्ती याच्याही पुढे जाऊन असे म्हणतात की प्रलयाशिवाय उत्क्रांती होऊच शकत नाही. सत्याचा मागोवा त्यांनी अशा प्रकारे घेतला. जग म्हणजे जे अव्यक्त स्वरुपात पूर्वी होते त्याचेच हे दृश्य स्वरुप होय. मुळात काहीही नसताना विश्व आपोआप निर्माण होत नाही जे कारण म्हणून सूक्ष्म रूपात विद्यमान असते. त्याचेच दृश्य जगतात रुपांतर होते अत्यंत शुल्लक तृणांकुरापासून तो उन्नत मानवापर्यंत जे काही आहे ते पूर्ण कौशल्य निर्माण झाले असून निर्मिती पूर्वी व निर्मिती नंतर ही मूळ रूपेच दृश्य जगतात रूपांतरित होत असतात. तुम्हा आम्हा सह अगदी शुल्लक गुणांकुर, जलबिंदू, छोटे प्रवाह, सूक्ष्म विचार ही सारी त्या सत् चित् आनंदाच्या अस्तित्व सागराच्या अनंताच्या ठिकाणी असतात. सगळ्या वस्तुमानात विद्यमानता विद्यमान असणे हा मूळ रूपाचा गुणधर्म आहे. प्रत्येक दृश्य पदार्थात त्याच्या वाचून दुसरे काहीच असू शकत नाही हेच त्याचे सत्यत्व नित्यच सत्य असू शकते.

### जगाचा भास अज्ञानमूलक

आमच्या अज्ञानामुळेच व्यक्त अनंतालाच आम्ही सृष्टी मानतो. आणि त्याच्याशी नाम रूपात्मक स्वरुपात व्यवहार करतो. नामरुपात्मक सृष्टी मानणे हे त्याच्या मूळस्वरूपाहून भिन्न मानणे होय. मात्र योग्य जाणीवेने या अज्ञानाची निवृत्ती होऊ शकते. अज्ञानाला शास्त्रात अविधा असे नाव आहे आणि ज्ञानाला विद्या म्हणतात. अज्ञानाचे दोन पैलू संभवतात - आवरण व विक्षेप मूळ रूप झाकाळून टाकणाऱ्या शक्तीला आवरण असे म्हणतात. मूळ स्वरुप झाकले जात असल्याने भ्रमात्मक ज्ञान निर्माण होते हे आवरण शक्तीने घडते. दुसऱ्या प्रकारच्या शक्तीमुळे मूळ स्वरुपात विपरितज्ञान होते. ते तसे नसताना तेच ते आहे. शिंपल्यावर रजताचे भासणे. अविद्या ही अनिर्वचनीय आहे. त्याचे अस्तित्व मानता आले तरी योग्य ज्ञानाने ते नाहीसे करता येते. अविद्येमुळेच आत्मतत्वाचे यर्थाय ज्ञान होत नाही.

### विज्ञानाचा दृष्टिकोण

आधुनिक वैज्ञानिकही वेगळ्या पद्धतीने याच एकात्मतेचा शोध घेताना आढळतात. आधुनिक शास्त्रज्ञांचा कलही या एकत्वाचा अनुभव घेण्याच्या दृष्टीने चालू आहे. सरजॉन वुड्राफ म्हणतो - ''विश्व म्हणजे केवळ चैतन्य प्रत्येक पदार्थात जीव तत्व आहे.'' कोणताही पदार्थ या सृष्टीत अजीव पदार्थ नाही. या जगात तुटकपणा वेगळेपणा जो ध्यानात येतो तो भासमान स्वरुपाचा असून गतिशीलता व अखंडताच या साऱ्यांच्या मुळाशी आहे. वेदांती ज्याला सत् चित् आनंद म्हणून संबोधतात तेच प्रवाही चैतन्य सर्व पदार्थांच्या बुडाशी आहे. परंतु ही गोष्ट ध्यानात येणे हीच माया आहे. चैतन्यापासूनच सगळे पदार्थ अभिव्यक्त होतात म्हणून सारे पदार्थ सजीवच आहेत. चैतन्याच्या प्रवाहात कुठेच खंड पडत नाही. यामुळेचे म्हणावे लागते की अजीव पदार्थ असूच शकत नाही.

सेंद्रीय व असेंद्रियात देखील सत्त्व गुणाचे अस्तित्व असते असे वेदांती व सांख्य तत्ववेत्ते मानतात. सत्वगुण

हा चैतन्याचा विलास आहे. तमस् गुण चैतन्याचे अस्तित्वच जाणवणार नाही इतपत त्याला झाकोळून टाकतो. असे जरी असले तरी जाणीवेचे अस्तित्व सर्वत्र असते. फक्त आवरणामुळे ध्यानात येत नाही. हळूहळू ही सजीवता वाढत्या क्रमाने वनस्पती, प्राणी मानव यांच्यात अभिव्यक्त होताना आढळते. या वरून वेदान्त विचार हा आधुनिक पाश्चात्य वैज्ञानिकांशी किती मिळता जुळता होत आहे हे ध्यानात येईल. यासाठी आधुनिक विज्ञानाला वेदान्तापाशी यावे लागेल. वेदान्ताला विज्ञानापाशी जाण्याचे कारणच नाही. वेदान्तानी हा विचार हजारो वर्षापूर्वी जगापुढे मांडलेला आहे. विज्ञान आज एकात्मतेचा अनुभव घेण्यासाठी उत्सुक झालेले आहे. आधुनिक विज्ञानाने हे व्रत घेतलेले आहे. ज्या क्षणी हे विज्ञानाला साध्य होईल त्या क्षणापासून विज्ञानाचे कार्य संपेल. तसेच रसायन शास्त्राचेही. एकाच रसापासून ही सारी रसायने झालेली आहेत हे सिद्ध होताच त्याचेही कार्य थांबेल विविधतेत एकत्व आहे हे - सिद्ध करणे एवढेच आधुनिक विज्ञानाचे कार्य आहे. अध्यात्म शास्त्र हे अंतर्विश्वाचे शास्त्र आहे. सकळ कारणांचे मूळ कारण शोधून अंतिम सत्याचा प्रत्यय घेणे हेच अध्यात्माचे कार्य आहे. विज्ञान बाह्य जगतातील नियमांनुसार त्याचा शोध घेत या साऱ्या दृश्य वस्तूंच्या मागे कोणते अंतिम सत्य दडलेले आहे याचा उलगडा करण्याचे कार्य करीत आहे.

## वैज्ञानिकांनी केलेली प्रगती

गॅलिलिओचा काळ (इ.स. १५६४-१६४२) साधारणपणे हा काळ आधुनिक विज्ञानाच्या सुरुवातीचा काळ मानला जातो. गॅलिलिओने गतिबद्दलचा सिद्धांत मांडला. हे जग-अणूपासून निर्माण झालेले आहे. अणूचे चार भाग संभवतात. वस्तुमान, आकार, वजन व गती. गतिमानतेमुळे एकत्र येऊन सृष्टी निर्माण करतात.

डाल्टन म्हणतो, जगातील प्रत्येक वस्तू ही मूल ९० घटकांपैकी दोन वा तीन घटक एकत्र येऊन बनली जाते. पदार्थ तीन प्रकारचे असतात. घन द्रव आणि वायू रूपात. सर जे. जे. थॉमस १८८७ - प्रयोगावरून खालील गोष्टी त्याच्या ध्यानात आली. दोन सळ्या अनुक्रमे ऋण व धन दर्शक एका बंद काचेच्या बरणीत ठेवून त्या उभयतात वीज संचालित करण्यात आली. त्या वेळी एक अनोखा प्रकाश झोत तयार होताना दिसला, त्याला कॅथाड असे म्हटले. यालाच इलेक्ट्रॉन म्हणून संबोधण्यात येवू लागले. हे इलेक्ट्रॉनच या विश्वाचे मूळ कारण आहेत अशी उपपत्ति पुढे आली, व कालांतराने मागे पडली.

अर्नेस्ट रूदरफोर्ड - यांनी नवी उपपत्ति मांडली. धन विद्युत् शक्ती ही अणूच्या मध्यवर्ती असते आणि ऋण विद्युत् कण त्याच्या भोवती फिरत असतात.

मॅक्स प्लांक - विद्युत् धन वा ऋण कण रूपाने नसून प्रवाहित असतात त्याना परावर्तित गती असते.

नील्स भोर - वरील साऱ्या उपपत्त्या या गणिताच्या द्वारे मांडल्या गेल्या आहेत. त्यामुळे गणिताचा वरचढ आढळतो. इलेक्ट्रान हा कण रूपी धन नसून तो प्रवाही आहे. त्याच्या अंतर अवकाशात वा पोकळीत तो प्रवाहित असतो. ही पोकळी वा हा अवकाश साधारणं अगर वास्तविक स्वरूपात नसून तो गणिताच्या द्वारे स्थापित केलेला आहे.

आधुनिक विज्ञान सतत एक गोष्टीचा ध्यास घेताना आज लक्षात येते. आजपर्यंत विज्ञानाकडून चेतन व पदार्थ (mind and matter) यातील फरक जे जोपासले गेले होते ते कसे चुकीचे आहे व पदार्थ म्हणून काही नसून सारे चेतनच कसे आहे हे सिद्ध करण्यासाठी पुढाकार घेताना आढळते. या वरून वेदांत्यांनी ही सारी माया आहे ब्रह्मच ते खरे आहे-असे जे म्हटले आहे त्यालाच आजचे विज्ञान पुष्टि देत आहे असेच म्हणावे लागेल. कारण फार पूर्वीच हे सांगितले गेले आहे. की चेतन व पदार्थ या दोनही गोष्टी

एकाच वहाचमून अभिव्यक्त झालेल्या आहेत. त्यामुळे या दोन्ही एकच आहेत.

डॉ. एस् एडिंग्टन म्हणतो- भौतिक विश्व काय स्वरुपात असावे याचा विचार करताना हे ध्यानात येते की हे भौतिक जग केवळ एक छाया आहे आणि हाच आजचा महत्वाचा शोध आहे. विश्व चैतन्यमय आहे. दृश्य जगत ही चैतन्याची छाया मात्र आहे. आमचा हा भ्रम दूर करत असताना आम्ही पदार्थ नाकारले कारण पदार्थ आहे असे मानणे हाच एक मोठा भ्रम होता असे आमच्या ध्यानात आले. या वरुन हा वैज्ञानिक वेदान्त विचाराच्या किती जवळ आलेला आहे हे ध्यानात येईल. वेदान्ती दृश्य जग ही माया आहे असे मानतो आम्हाला जगाचे भ्रामकत्व ज्ञात होते. वास्तविक हे चैतन्यमय आहे हा विचार वेदान्त्यांनी केक शतकापूर्वी मांडलेला आहे.

सर जेम्स जीन्स- गूढ विश्व- या वरत तो म्हणतो ज्ञानाचा प्रवाह अखंड वहात आहे. जग हे केवळ जड नसून विचार प्रवाहांनी व्याप्त आहे. द्वंद्व विचारामुळे हे सारे दडपले गेले आहे आणि तो विचार हळूहळू अस्त पावत असून पदार्थ म्हणजे चैतन्याची छाया हा विचार बळावत आहे. चैतन्यानीच ही छाया जन्माला घातली कारण चैतन्य सिध्द करण्याकरता ती आकाराला आली आहे. हा नवा विचारच पुन:ठासून मांडला आहे. गणितातील शून्य, भूमितीतील बिंदू या उभयतात अनंताचा अर्थ भरलेला आहे. रसायनशास्त्राला आता उमगले आहे की मूळ घटक द्रव्ये ९० प्रकारची आहेत हा विचार बाजूला पडून एकाच तत्वाची ही विविध रस निष्पत्ती आहे. एकच तत्त्व भौतिकतेत आहे. विविधता अभिव्यक्त होताना मी, तू चंद्र, सूर्य, तारे ही सारी त्या अथांग अस्तित्व सागरातील छोट्या लाटा आहेत. या साऱ्या घटने मागे एकच एक आत्मतत्व असून सर्वांनाच व्यापून ते राहणारे आहे. तेच सत्य आहे. तेच एकमेवाद्वितीय आहे असे ठामपणाने वेदान्ताने सांगितले आहे.

## उभय विचारांचे कार्य

अशा प्रकारे विज्ञान व वेदान्त यातील दुरावा नाहीसा होत चालला आहे. वैज्ञानिकांच्या आधुनिक विचाराने दोन्हीतील समानतेला चालनाच मिळालेली आहे. आता विज्ञान वेदान्ताकडे तुच्छतेने पाहात नाही. मानवतेच्या कल्याणासाठी उभयतात समन्वय घडणे आवश्यक आहे. मानवातील बंधुभाव वाढीला न लावता केवळ मानव संहाराचे एक साधन म्हणून विज्ञान वापरत राहील व केवळ राजकारणी व धूर्त लोकांच्या हातातील बाहुले बनेल तर विज्ञानाचा अध:पात होईल. तसेच आत्मिक संबंध प्रस्थापित करून माणसाला दिलासा देण्याचे, त्यांच्यामध्ये भ्रातृभाव जागा करून आध्यात्मिक एकता प्रस्थापित करण्याचे वेदान्तविचाराने पटविण्याचे काम झाले नाही तर हा आत्मिक विचारही वांझ ठरेल. मानवाच्या कल्याणासाठीच झटण्याचे व्रत घेणे आवश्यक आहे. हे विश्व सर्वांनाच आनंदाने खेळण्याचे पटांगण झाले पाहिजे. बंदुकीच्या गोळ्यांनी पटापट टिपण्याचे हे रणांगण होता कामा नये विज्ञानातील युक्लिड, टॉलेमी, न्यूटन यांचे द्वैती विचार बाजूला सारुन आईनस्टीन, हायझेनबर्ग, एडिंग्टन यांनी वेदान्ताशी मिळते जुळते विज्ञान आणून ठेवले आहे. वेदान्ती व वैज्ञानिक या उभयतांनी भविष्यकाळात एकात्मतेच्या प्रत्ययाचा वेध घेणारे मानवी व्यवहार घडवून आणण्यात प्रयत्न तरच विश्वात मांगल्य, सौहार्द प्रस्थापित होईल. सुसंस्कृता साकारेल. 'कृण्वन्तो विश्वमार्यंच' याला अर्थ प्राप्त होईल.

- शं. बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

# विद्यापीठ - प्रतिष्ठान

*'पौष्कर संहिता' या संस्कृत ग्रंथाचे लेखक डॉ. प्रभाकर आपटे यांचा याच ग्रंथावरील लेख येथे देत आहोत.*

## पौष्करसंहिता (इ.स. चवथे शतक) या ग्रंथावर आधारित

महाभारताच्या भीष्मपर्वात सात्वत विधींचे वर्णन आले आहे. वासुदेव हा परमात्मा असून त्याची आराधना प्रथम संकर्षणाने केली असे भीष्मपर्वात म्हटले आहे. वैदिक परंपरेपेक्षा ही वेगळी परंपरा आहे ज्यात ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र या चारही वर्णांना मुक्तप्रवेश आहे. मन्दिरान्तर्गत मूर्तिपूजेचा प्रचार करणारा हा सात्वतधर्म पांचरात्र आगम या नावानें द्वापरयुगाचे अखेरीस आणि कलियुगाचे आरंभी प्रचारात आला. या धर्माचा अधिक विस्तृत वृतान्त महाभाराच्या मोक्षधर्मपर्वात आला आहे. या पांचरात्र आगमाच्या पहिल्या तीन संहिता: सात्वत-पौष्कर जयाख्य या नावाने ओळखल्या जातात आणि त्यांना रत्नत्रय असे म्हटले जाते. या मागील पार्श्वभूमी अशी आहे. वेदव्यासांनी एकसंध वेदाचे ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अथर्ववेद या संहितांमध्ये विभाजन केले असे मानतात. अर्थात् विभाजनापूर्वीचा एकसंध वेद म्हणजे मूळवेद किंवा एकायनवेद अशी संकल्पना मांडून पांचरात्र आगमाच्या ऋषींनी त्या एकायनवेदांच्या तीन संहिता म्हणजे सात्वत पौष्कर-जयाख्य अशी मांडणी पांचरात्र आगमाच्या ऋषींनी त्या एकायनवेदांच्या तीन संहिता म्हणजे सात्वत-पौष्कर-जयाख्य अशी मांडणी केली. एकायन म्हणजे वेदांप्रमाणे अनेक देवतांची आराधना अशी मांडणी केली. एकायन म्हणजे वेदांप्रमाणे अनेक देवतांची आराधना न करता एकच एका विष्णूची उपासना सांगणारा वेद या सात्वतधर्माची आणखी वैशिष्टे म्हणजे, अहिंसा, निष्काम कर्म आणि स्वर्गप्राप्तीच्या ऐवजी मोक्षप्राप्तीची आस हे प्रमुख ध्येय.

या धर्मप्रसाराबरोबर पुण्यासंपादनासाठी, मूर्तिपूजेबरोबर उत्सव तीर्थयात्रा इत्यादींचा समावेश आवर्जून करण्यात आला. राजे आणि धनिक यांनी मंदिरांच्या उभारणीसाठी केलेल्या दानातून मिळणाऱ्या पुण्याची एक प्रकारे तैलनिक कोष्टके आगमग्रंथातून उपलब्ध झाली. देवालयांसाठी केवळ तात्कालिक दान न देता स्थायी स्वरुपाची निरंतरची व्यवस्था सांगून त्यासाठी आगमधुरीणांनी प्रतिष्ठान हा पारिभाषिक शब्द रूढ केला. आलया प्रतिष्ठान म्हणजे देवालयांच्या निर्मितीसाठी आणि तदनंतर आवश्यक असलेल्या देखभालीसाठी, ताम्रशासन म्हणजे ताम्रपट देऊन देवालयासाठी, 'अकृत्रिम' म्हणजे वेळोवेळी दानावर अवलंबून राहावे न लागणारे दान म्हणजे भूमिदान आणि 'अकण्टक' म्हणजे निर्वेध अशा 'वृत्ति' ने युक्त असे प्रतिष्ठान निर्माण करावे अशा तऱ्हेचे आवाहन इंग्रजीत याला permanent endowment with copper-plate land grants with donation without impediment असे म्हणता येईल १)आलयप्रतिष्ठानाला आनुषांगिक २) ब्रह्मप्रतिष्ठान ३) सिध्दांतप्रतिष्ठान ४) ज्ञान प्रतिष्ठान ५) वापीकूपतटाकाराम प्रतिष्ठान आणि ६) फलमूलान्न प्रतिष्ठान अशा प्रतिष्ठानांची संकल्पना मांडून त्या द्वारे मिळणाऱ्या पुण्याची व्यवस्थापना पौष्करसंहितेत नानाधर्म प्रतिष्ठान या शीर्षकाच्या एकेचाळीसाव्या अध्यायात केलेली आहे. आज ही या शासकीय विभागाला दक्षिणेत आन्ध्र, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यात Hindu Religious and charitable endowments असे संबोधून त्यासाठी वेगळे मंत्रिपद आहे. केरळात याला देवस्वम् बोर्ड असे म्हणतात. महाराष्ट्रात सार्वजनिक विश्वस्त आयोग असा

विभाग आहे. भारतरत्न पां. वा. काणे यांनी वैदिक साहित्यात 'इष्ट आणि आपूर्त' हे दोनच शब्द देवादाय आणि धर्मादाय कायद्याचे आधारस्तंभ आहेत असे म्हटले आहे. परंतु डॉ. पां. वा. काणे याना आगम ग्रंथातील हे विपुल साहित्य उपलब्ध नव्हते हे खरे.

तर या प्रतिष्ठानांपैकी सिद्धान्त प्रतिष्ठान आणि ज्ञान प्रतिष्ठान या दोन प्रतिष्ठानांतील माहिती विद्यापीठे आणि ग्रंथालये या उद्‌गम-विकासाचे प्राचीन टप्पे म्हणता येतील. पौष्करसंहितेनंतर कालक्रमानें येणाऱ्या रत्नत्रयीपैकी तिसऱ्या म्हणजे जयाख्य संहितेत वैष्णवांचे सतरा प्रकार दिले असून त्यापैकी शास्त्रधारक आणि शास्त्रज्ञ हे हस्तलिखित ग्रंथभांडाराचे पालक म्हणजे क्यूरेटर आणि संशोधक विद्वान असे मानता येतील.

'शास्त्रधारक' या शब्दाची परिभाषा विशद करतांना जयाख्य संहितेत जी व्यक्ती दूरदूरवर विखुरलेले ग्रंथ परिश्रमपूर्वक संकलित करतो आणि त्यांची उत्तम निगा व देखभाल करतो तो अशी व्याख्या केली आहे. 'शास्त्रज्ञ' याची व्याख्या करताना शास्त्र ग्रंथ म्हणजे विशेषेकरून मंदिरांतर्गत मूर्तिपूजेचे प्रमाणग्रंथ अभ्यासून त्यातील त्रुटींवर चिंतन करून त्या पोथ्यांवर संस्कार करतो तो : 'प्रयत्नात् संस्करोति य:' अशी करताना 'प्रणष्टलुप्त पाठानां' म्हणजे जे पाठ ग्रंथपाताच्या स्वरूपांत सापडणाऱ्या पलिकडे आहेत असे पाठ हा खुलासा केला आहे. ग्रंथकाराच्या तोडीची योग्यता नसताना घुसडलेल्या पाठांना प्रक्षिप्त म्हणजे interpolation असे म्हणतात. अशा प्रक्षिप्तांची बरीच भरताड मूळ ज्ञानेश्वरीत ज्ञानेश्वरानंतर एकनाथांच्या काळापर्यंत होत राहिल्यामुळे ते सगळे तण साफ करून यावच्छक्य शुद्ध पाठ एकनाथांनी परिश्रमपूर्वक तयार केला आणि पुन्हा त्यात प्रक्षिप्ते घुसडण्याचा मोह ज्यांना पडेल अशांना एक प्रकारचा दम किंवा तंबी संत एकनाथांनी स्वत: एका ओवीची मोहोर लावून दिली आहे. ती मराठी वाचकांना विदित आहेच. तरी पण ती इथे दिलेली बरी.

'इथे ग्रंथाचिये पाठी। जो ओवी करील मऱ्हाटी। तेणे अमृताचिये ताटी। जाण नरोटी ठेविली. अर्थात् जयाख्य संहितेतील शास्त्रज्ञ या व्याख्येत बसत नाही. उपनिषदांच्या शैलीचे अनुकरण करून श्रीमत् शंकराचार्यांनी रचलेली शतश्लोकी प्रसिद्ध आहे. पण तुलनेनें अलिकडील काळात रचली गेलेली वास्तुसूत्र-उपनिषद् - शिल्परहस्य- उपनिषद् - गर्भोपनिषद् इतकेच काय अल्लोपनिषद् ही उदाहरणे शैलीच्या अनुकरणाची आहेत. अगदी अलिकडील काळात लोकमान्य टिळकांनी सांख्यकारिकांचा चिकित्सक अभ्यास करून त्यात एका स्वरचितकारिकेची सांगून सवरून भर टाकली आहे. संशोधनाला अनुकूल अशा केवळ ग्रंथाची उपलब्धता संशोधकांना करून देणे एवढेच ग्रंथपालनशास्त्राचे मर्यादित क्षेत्र नव्हे. तर एखाद्या संशोधकाला उपयुक्त माहिती मिळवून देणे आणि भावी अभ्यासकांसाठी संभाव्य उपयुक्त माहितीचे आगाऊ संकलन करून ठेवणे हे ही त्या शास्त्रात अपेक्षित आहे. मम्मटाने आपल्या काव्यप्रकाश या ग्रंथात काव्याची प्रयोजने सांगताना : काव्यं १ यशसे २ अर्थकृते ३ व्यवहारविदे ४ शिवेतरक्षतये ५ सद्य:परनिर्वृतये आणि ६ कांमासंमितनयोपदेशयुजे। अशी सहा प्रयोजनें सांगताना अर्थकृते आणि शिवेतरक्षतयेसाठी दोन ऐतिहासिक नोंदींचा उल्लेख केला आहे. 'श्रीहर्षादि: धावकादीनाम् इव धनम्' असे म्हणून श्रीहर्षविरचित रत्नावली हे नाटक धावक कवीने लिहिले आणि धनाच्या मोबदल्यात ते श्रीहर्ष राजाला विकले असे स्पष्ट संशोधनानुकूल विधान केले आहे. तसेच मयूर कवीनें सूर्यशतक लिहिले आणि त्याचे श्वेतकुष्ठ बरे झाले अशी माहिती नोंदवली आहे. हे दोन्ही विषय अधिक संशोधनासाठी उपयुक्त आहेत.

पौष्करसंहितेच्या एकेचाळीसाव्या अध्यायात (श्लोक ४२ ते ६५) देवालयाची प्रतिष्ठापना झाल्यानंतर, मंदिरान्तर्गत नित्यनैमित्तिक-काम्य पूजाअर्चा करण्यासाठी मंदिरासमीप अग्रहाराची वसाहत निर्माण करणे म्हणजे

ब्रह्मप्रतिष्ठान. ज्या मंदिरासाठी हा अर्चक समुदाय वसवायचा ते पंचायतन देवालय बांधून दात्याने कामनारहित म्हणजे निष्काम भावनेने लोकार्पण करावयाचे ही प्रथा कलियुगाच्या चौथ्या सहस्रकाच्या पूर्वार्धापासून म्हणजे इ.स.वी.सनाच्या तिसऱ्या चौथ्या शतकापासून आजतागायत अखण्डपणे चालू आहे. याचे वेळोवेळीच्या नोंदी शिलालेखातून आणि ताम्रपटातून सापडतात. देवालयाला समर्पित भूमीचा राजकीय उपयोग मुस्लिम आक्रमकांखेरीज हिंदुशासकांकडून क्वचितच घडलेला आढळतो. अलिकडील काळांत श्रीरामानुजांची जन्मभूमी श्रीपेरांबुदूर येथील रामानुज मठाच्या मालकीची जमीन कै. राजीव गांधी यांच्या सभेसाठी विश्वस्तांनी उदारपणे दिली. परंतु राजीव गांधींच्या हत्येच्या घटनेनंतर राजकीय दबावखाली त्यांच्या स्मारकासाठी मठाची विस्तीर्ण जागा अधिग्रहीत केली गेली. आणि विद्यमान मठाधिपतींनी त्या हस्तांतरणास विरोध दर्शवल्यानंतर त्यांना मिळालेल्या राजकीय धमक्यांचा मोबदला म्हणून त्यांना एक शिपाई अंगरक्षक म्हणून तैनात केला गेला एवढेच. दुसरे उदाहरण म्हणजे तिरुपती-तिरुमला देवस्थानच्या मालकीच्या सात टेकड्यांपैकी म्हणजे सप्तगिरीपैकी केवळ दोन टेकड्या देवस्थानकडे ठेवून बाकी पांच टेकड्यांचे सरकारीकरण करण्याचा घाट विद्यमान मुख्यमंत्री सॅम्युअल राजशेखर रेड्डी यांच्या सरकारी कारभारात घातला जात आहे. एवढेच नव्हे तर देवस्थानच्या जमिनीवर नवे चर्च बांधण्याचा बेत आहे असे कळते. त्या आधी देवस्थानच्या पवित्र प्रसादाचे लाडू बनवण्याचे कंत्राट एका ख्रिस्ती मिशनरी कंपनीला मिळाले देखील आहे असे कळते. प्रसारमाध्यमे या बाबतीत का मौन पाळतात कळत नाही.

तर ब्रह्मप्रतिष्ठानाबाबत आणखी एक उदाहरण म्हणजे रामराज्याभिषेकानंतर बिभीषणाने श्रीरामाच्या पूजेतील रंगनाथाच्या मूर्तीची याचना केली. अशी कथा पांचाराम आगमाच्या ईश्वर आणि परमेश्वर संहितांमध्ये आली आहे. या कथेनुसार बिभीषण ही मूर्ती घेऊन लंकेला प्रस्थान करीत असता वाटेत कावेरीच्या तीरावर त्रिचनापल्लीजवळ स्नानसंध्येसाठी थांबला. श्रीरंगनाथाची मूर्ती कावेरीतटावर ठेवताच कावेरी नदीने आपल्या पात्राचे द्विभाजन करून दोन भुजांनी रंगनाथस्वामींना अलिंगन दिले. म्हणजेच भौगोलिक दृष्ट्या त्रिचनापल्लीजवळ श्रीरंगम् हे आजचे विद्यमान बेट तयार झाले.

या कथेप्रमाणे भगवन्तानां हे रम्य स्थान आवडले आणि त्यांनी शोकाकुल बिभीषणाला त्या ठिकाणी देवालय निर्माण करून, अर्चक समुदायाची वसती निर्माण करण्याची आज्ञा केली. म्हणजेच आलय व ब्रह्मप्रतिष्ठापना करण्याची आज्ञा केली. बिभीषणाच्या आग्रहास्तव श्रीरंगनाथानी 'शयनोऽहं रंस्ये त्वाम् अभिवीस्यच' म्हणजे 'तुझ्याकडे कृपाकटाक्ष टाकत मी तेथेच पहुडलेला राहीन' असे आश्वासन दिले. परिणाम स्वरूप रंगनाथाचे गर्भगृह किंचित् पूर्वेकडे कलणारे पण दक्षिणाभिमुख आहे. अन्यत्र देवालये ही पूर्वाभिमुख असावीत असा संकेत आहे. आलय प्रतिष्ठान आणि ब्रह्मप्रतिष्ठान यांची ही काही प्रत्ययकारी उदाहरणे. ईश्वरपारमेश्वरसंहिता यांचा कालखंडही आठव्या शतकापूर्वीचा आहे.

त्यानंतरचे प्रतिष्ठान म्हणजे सिद्धान्त प्रतिष्ठान. त्याबाबत पौष्कर संहिता (४१.६६) ग्रंथात स्वसिद्धान्त प्रतिष्ठानासाठी आयतनाच्या आवारांत एक मठ स्थापन करावा आणि त्यांच्या निर्वाहासाठी अकृत्रिम व्यवस्था करावी असे म्हटले आहे. मठम् आयतने कृत्वा वृत्तिपूर्वम् अकृत्रिमम्। त्यापुढची पायरी म्हणजे मठाच्या इमारतीसमवेत वाण्यांची कुटंबे आणि दुकाने वसवावीत. त्याबरोबर दासगण म्हणजे सेवक वर्गाची वसति स्थापावी. 'वणिक् कुटुंबभृतकै: युक्तं दासगणेन तु। अलिकडच्या भाषेत शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि सर्व्हंटस् कार्टर्स असे म्हणता येईल. त्या पाठोपाठ पाण्याची सोय. त्यासाठी आड आणि विहिरी म्हणजे पायऱ्यांच्या विहीरी आणि रहाटगाडग्याच्या विहीरी

हव्यात. वाप्य: अरघट्टजालिन्य: सह वातायनै: स्थिता:। या विहिरींना जाळीच्या खिडक्या देखील हव्या. या मठात अभ्यागतांची व्यवस्थाही हवी. असे बरेच तपशील या सिद्धान्त प्रतिष्ठानात आहेत. अभ्यागतांच्या सोईत अन्नसंतर्पण पण सांगितले आहे. आणि तो भाग आहे अन्नप्रतिष्ठानाचा। या वेळी अन्नमूर्तीची प्रतिष्ठापना करून तिला प्रलयकालापर्यंत अन्नाचें अक्षय्य रक्षण करण्याची प्रार्थना केली जाते.

त्यानंतर या अध्यायात (४१.७७ ते ९७) ज्ञानप्रतिष्ठानाचें वर्णन आले आहे. हे प्रतिष्ठानकर्त्याला अखिलसुखाची प्राप्ति करून देऊन अन्ती मोक्ष देते. या प्रतिष्ठानाद्वारा जे ज्ञान प्राप्त होते ते विवेकासहित असते. यासाठी पंचरात्र आगमाचे ग्रंथ संशोधन करून निवडून त्यांचा संग्रह करावा असे म्हटले आहे. पण केवळ आगमग्रंथ एकत्र करून सर्वसमावेशक ग्रंथालय होणार नाही. म्हणून वेदान्तासहित सर्व वेदांचा संग्रह, स्मृति-आणि स्मृत्यन्तर म्हणजे उपस्मृती, इतिहासग्रंथ म्हणजे रामायण व महाभारत, त्याखेरीज आन्वीक्षिकी, राजनीति इ. विद्या, शब्दविद्या म्हणजे व्याकरणग्रंथ असा सर्वच ग्रंथाचा संग्रह अपेक्षित आहे. पुराणग्रंथांच समावेश गृहीत धरावला हवा. या सर्व ग्रंथांच्या 'नन्दीनागर' इत्यादी लिप्यांमधे प्रती कराव्यात असे इथे म्हटले आहे. पौष्कर संहिते कालखंडात आणि भौगोलिक परिघांत नन्दीनागरी लिपी प्रचलित असावी असे वाटते. या प्रती तालपत्रांवर टोकरून कराव्या असें 'पूरयित्वा' या क्रियापदावरून वाटते. कारण तालपत्र म्हणजे ताडाच्या पानांवर अक्षरे कोरून त्यात मषी म्हणजे शाई भरण्याची प्रक्रिया रूढ होती. ही तालपत्रे अक्षय अशा संपुटात म्हणजे लांबट चौकोनी लाकडी किंवा धातूच्या पेटीत ठेवाव्यात असे वर्णनावरून सुचवल्यासारखे वाटते. ही सर्व तालपत्रे त्यात भोके पाडून जाड दोरीनें गुंफून, सुस्थित, सुप्रसिद्ध आणि राजे आणि नागरिक ज्याचा उपयोग करू शकतील अशा ठिकाणी जतन करून ठेवाव्या असे म्हटले आहे. त्यासाठी राजवाड्यासमीप एक दगडी भवन बनवावे आणि त्यात लोहयंत्राची योजना करावी असे म्हटले आहे. लोहयंत्र याचा नेमका अर्थ कळत नाही. पण ती केवळ उघडी शेल्फ सारखी फडताळे नसावीत तर त्यांत खालीवर, किंवा उघडझाप करण्याची सोय अभिप्रेत असावी. हे भवन कवाडे म्हणजे दारे असलेले असावे आतील भिंतींना चुन्याची सफेदी फासलेली असावी. तत्कालीन प्रकाशयोजनेला हे अनुकूल साधन असावे. या भवनामध्ये वागीश्वरीची म्हणजे सरस्वतीची पद्मासनाधिष्ठित मूर्तीची प्रतिष्ठापना करावी असे विधान आहे. ही वागीश्वरी वैष्णव संप्रदायाची अधिष्ठात्री असल्याने चार हातात शङ्ख, चक्र, गदापद्म ही वैष्णव आयुधे आणि त्याशिवाय जपासाठी अक्षमाला, शास्त्रग्रंथ, आणि उरलेल्या दोन हाताच्या वरमुद्रा आणि अभयमुद्रा दर्शविणारी म्हणजे अष्टभुजा वागीश्वरीचे वर्णन केले आहे. हे वर्णन 'वीणावरदण्डमण्डितकरा' या सरस्वतीच्या वर्णनापेक्षा वेगळे आहे. अर्चकाने ही सिद्धता झाल्यावर शुभ्रवस्त्र परिधान करून त्या पोथ्या त्या लोहयंत्रावर आधी 'ओम्' ही अक्षरे लिहून त्यावर क्रमवारीने रचून ठेवावीत. आणि त्यांची यथासांग पूजा करावी. पूजेनंतर नेत्र वस्त्रांनी ते शास्त्रग्रंथ गुंडाळावेत. इथे 'नेत्रवस्त्र' याचा अर्थ वस्त्रांची अशी गुंडाळी करून गांठी माराव्यात जेणेकरून ते ग्रंथ वाहून न्यायला सोईचे पडावे. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या द्वादशाक्षरमन्त्रोच्चारानीं पूजन करून खालील श्लोक म्हणावा.

"विशुद्धज्ञान देहाय विष्णवे परमात्मने (नम:)"

म्हणजे विशुद्धज्ञान हे ज्याचे शरीर आहे अशा विष्णुपरमात्म्यास नमस्कार असे । "(हे प्रभो!) शास्त्रात्मरूपाने तू या वास्तूत अक्षय्यपणें सुप्रतिष्ठित होऊन अज्ञानी लोकांच्या उपकारासाठी आणि त्यांचे प्रबोधन करण्यासाठी रहा. सुप्रतिष्ठितम् अक्षय्यं तिष्ठ शास्त्रात्मने हवै। अज्ञानाम् उपकारार्थं प्रबोधजननाय च।" "अशा स्वरूपातील तुझ्याखेरीज देवदेखील क्षयवन्त म्हणजे नश्वर

आहेत. मुक्त्या त्वाम् एवम् अक्षय्यं क्षयवन्तोऽमरादवः॥"

यानंतर दररोज वेदवेदान्त शरीरधारी, आणि आगम भगवत्पर पुराणादीनि अलंकृत अशा देवाची नित्यपूजा करण्यासाठी या विद्यापीठाच्या समोर म्हणजे अग्रभागी एक शब्दब्रह्माने भारित असे पवित्र भद्रपीठ करून त्या प्रातिनिधिक पूजेसाठी अप्रमत्त म्हणजे जागृत म्हणजे विद्यासंपन्न अर्चकाची नियुक्ती करावी. त्यानंतर विद्यापीठ प्रतिष्ठानाची संकल्पना करणाऱ्या दात्यानें धूपारती करून विद्यापीठ भवनाला प्रदक्षिणा घालून ताम्रपटावर दानपत्र लिहून या शास्त्रसंग्रहाच्या निरंतर रक्षणासाठी पुरेशी आर्थिक व्यवस्था करतांना ज्ञानपिपासू वाचकांना हवे ते ग्रंथ घेऊन जाण्याची सोय करावी असा विशेष उल्लेख आहे. 'संचारदाने अर्थिनांच संचयं तत्र संचयेत्। या ज्ञानकोशाच्या अनुपालनासाठी वेगळे अनुदान अनुपालकाच्या म्हणजे क्यूरेटरच्या वृत्तीसाठी द्यावे असे मुद्दाम सांगितले आहे.

त्यानंतर हात जोडून ब्रह्मवृन्दांसह वेदपाठ करून अन्ती खालील प्रार्थना करावी.

"अज्ञानतिमिरान्धानां जनानाम् अविवेकिनाम्।
शास्त्रपीठ प्रतिष्ठानाद् ज्ञानम् एति च निर्मलम्॥"

या प्रतिष्ठानाच्या स्थापनेतून मिळणाऱ्या पुण्यफलानें भगवान हरि प्रसन्न होवो. यातून मला कोणतीही फलाभिलाषा नाही. अशा तऱ्हेने दात्यानें लोकार्पण करावयाच्या विद्यापीठ प्रतिष्ठानाचें वर्णन पौष्करसंहितेच्या एकेचाळीसाव्या अध्यायात मिळते. हा ग्रंथ इ. सनाच्या चौथ्या शतकातला म्हणजे जवळपास सतराशे वर्षापूर्वीचा आहे आणि त्यात भिन्नभिन्न प्रतिष्ठानांबरोबर 'विद्यापीठ प्रतिष्ठान' हा प्रचलित शब्द तसाच्या तसाच आला आहे. म्हणून ही माहिती दिशाच्या वाचकांच्या समोर ठेवीत आहे.

**डॉ. प्रभाकर आपटे**
२/१४, दामोदर सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७

*जाता जाता ...*

अनेक संस्था अनेक संकल्पनांशी निगडीत आहेत. या संकल्पना, संकेत कोणते याबद्दल संस्था संकेत कोश या नावाचा संदर्भ ग्रंथ प्रसिद्ध आहे. हणमंते यांनी एकत्रित संघटित केलेल्या कोशानुसार अनेक संस्था संकलित साहचर्याचा खुलासा होतो. अशीच काही संग्राह्य माहिति

**पुढील ५ स्थाने दत्तात्रेयाची आहेत.**

१) गिरिनार २) गाणगापूर ३) नरसोबाची वाडी
४) औदुंबर ५) कारंजा.

**पुढील ११ मारूती समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केले आहेत.**

१) शहापूर २) मसूर ३ ) ४) चाकण ५) उंब्रज
६) शिराळे ७) मन पाडले ८) पारगाव ९) माजगाव
१०) शिंगणवाडी ११) बाहे

**१८ पुराणे पुढीलप्रमाणे आहेत.**

१) मत्स्य २) मार्कंडेय ३) भविष्य ४) भागवत
५) ब्रह्मांड ६) गरूड ७) लिंग ८) पद्म
९) वाजता १०) अग्नि ११) कूर्म १२) स्कंद
१३) नारद १४) वराह १५) ब्रह्मवैवर्त १६) विष्णु
१७) ब्रह्म १८) शिव.

# मंगळा गौर जागविण्याच्या निमित्ताने

*श्रावण भाद्रपद हे आपल्या संस्कृतिक सणाचे महिने श्रावण महिन्यात नववधूने पाच वर्षापर्यंत मंगळागौर पुजण्याची आपली परंपरा आहे. सौभाग्यवर्धन असे हे व्रत उत्सव व उत्साहपूर्ण रीतीने करावे ही अपेक्षा आहे. 'संस्कार भारतीने' खेळांचे प्रात्यक्षिक घेण्याच्या दृष्टीने शिबीर घेतले गेले. त्या शिबीरानिमित्ताने व्यक्त झालेत हे विचार - संपादक*

श्रावणामधील नववधूचा मोठा सण म्हणजे मंगळागौर... नववधूने अंगीकारावयाचे हे व्रत. काय आहे हे व्रत?

मंगळागौर म्हणजे आदिशक्तीची पूजा. स्त्री म्हणजे काय तर साक्षात मांगल्याचे प्रतीक. पांडुरंग शास्त्री आठवले म्हणतात की, 'स्त्रीची निर्मिती ही विश्वातील, ब्रह्मदेवाने निमार्ण केलेल्या सर्वात चांगल्या कलाकृतींपैकी एक आहे.'

कुणीसं म्हंटले आहे की पुरुष हा घरांचे अस्तित्व आहे तर स्त्री म्हणजे साक्षात मांगल्य. असे मांगल्याचे प्रतीक असलेल्या स्त्रियांचा हा सण. भारतात शक्ती उपासना फार प्रचीन काळापासून प्रचलित आहे. सांसारिक माणसाच्या प्रांगणात अनेक प्रकारे देवी उपासना करण्यात येते.

धनसंपत्ती प्राप्त करून देणारी ती लक्ष्मी. विद्याप्रदान करणारी ती सरस्वती. स्त्रियांना पातिव्रत्याचा लाभ व्हावा म्हणून पूजिली जाणारी पार्वती. सर्वत्र मंगलत्वाचे साम्राज्य निर्माण व्हावे म्हणून मंगळागौर. अन्नसमृद्ध करणारी गणेशाबरोबरची गौरी. प्रांपचिक संकटापासून संरक्षण करणारी दुर्गा. संहारशक्ती म्हणून प्रसिद्ध असलेली कालीमाता.

अशा विविध रूपांत नटलेल्या देवीची पूजा संसारी माणसांच्या घरात प्रत्यही होत असतेच. हे सर्व कशासाठी?

तर देवींने म्हणजेच आदिशक्तीने आपल्या सर्वांवर कृपा करून आपल्या सर्वांना सुखात, आनंदात, समृद्धीत ऐश्वर्यात ठेवावे, हीच आपली प्रार्थना असते.

आपले सर्वच सण कृषिप्रधान परंपरेला धरून आहेत. श्रावणात निसर्ग आपले सौंदर्य भरभरून प्रगट करत असतो. आकाशात नभांचे खेळ व पावसांच्या सरी, तर पृथ्वीवर डोलणारी हिरवीगार शेते, धबधबे, निसर्ग नुसता नटलेला असतो. अशा या मंतरलेल्या वातावरणात मंगळागौरीचा दिवस उजाडतो. ''मंगळागौरीचा सण'' हा कौटुंबिक व सामाजिक असा सण आहे. हे व्रत ५ वर्षे करायचे आणि ५ व्या वर्षी उद्यापन करायचे.

गणपतीला २१ दुर्वा, शंकराला ११ एकादशण्या तर देवी पूजनात कोणत्या आकड्यांस महत्त्व आहे? तर १६ देवीचे अध्याय १६ आहेत. मंगळागौरीच्या पूजेतही १६ डाळी, १६ तांदूळ इ. गोष्टी असतात. आपल्या विश्वातील ८ दिशा आणि पृथ्वी व आकाश मिळून २. ८ x २ = १६ यातील गूढार्थ म्हणजे या आदिशक्तीचे अस्तित्व सर्वत्र आहे, ईश्वराचे अस्तित्व चराचरात आहे, संपूर्ण विश्वात आहे. 'मी' आपण या विश्वातीलच एक अंश आहोत. तेव्हा या देवत्वाचा, चैतन्याचा अंश माझ्यात, आपल्यांत आपल्या सर्वांच्यात आहे. श्रद्धा व भक्ती या आपल्या प्रयत्नांनी आपण निर्गुणाकडे सगुण पूजेतून जाण्याचा प्रयत्न करायचा आहे, आणि या जन्मात 'नराचा नारायण'' होण्याचा प्रयत्न करायचा.

मंगळागौरीच्या पूजेतील १६ पत्री आपण स्वत: खुडून आणायच्या ठरवले तर त्या निमित्ताने निसर्गाच्या सान्निध्यांत जातो. श्रावणातील या धुंद वातावरणामुळे साहाजिकच आपले मन प्रसन्न होते. थुईथुई नाचायला लागतो, मेंदीच्या पानावर डोलायला लागतो, मन मोराचा जणू काही पिसाराच फुलतो. आपण स्वत:ला हरवून असतो. आणि साहाजिकच बालकवींची कविता आठवते,

*श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे।*
*क्षणात येते सरसर शिरवे,*
*क्षणांत फिरुनी उन्ह पडे॥*
*वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे*
*मंगल तोरण काय बांधिले, नभोमंडपी कुणीभासे॥*
*उठती - वरती जलदांवती अनंत संध्याराग पहा*
*सर्व नभांवर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा॥*
*खिल्लारे ही चरती रानी, गोपही गाणी गात फिरे,*
*मंजुळ पावा गात तयाचा, श्रावण महिमा एकसुरे॥*
*देवदर्शना निघती ललना, हर्ष माईना हृदयांत*
*त्यांच्या वदनी ऐकून घ्यावी, श्रावण महिन्याचे गीत॥*

१६ घरच्या १६ जणी मोठ्या उत्साहात जमून मंगळागौरीच्या खेळांना सुरूवात करतात. पाहू या आता यांचे प्रात्यक्षिक,

*प्रथम धरूयांत आपण साऱ्याजणी फेर!*
*नाचू गाऊ चला उठा फेर धरायला*
*संस्काराची मंगळागौर चला जागवाया।*
*आत्या, काकू, मामी, आजी, आई आणि सासुबाई*
*जमल्या साऱ्या कौतुकाने खेळे पहायाला ॥१॥*
*मंगलमाते मंगळागौरी। भक्ती भावे पूजा करोनी, प्रेमभरे*
*जमती साऱ्या आरती करायला ॥२॥*
*वशेळ्या त्या साऱ्या जमती, सौभाग्याचे दान मागती।*
*मान त्यांचा आज बाई चला राखायला॥३॥*
*टिपरीवर टिपरी वाजे । तालावरती पाऊल नाचे। झिम्मा,*
*फुगडी गोफ त्यांच्या चला पहायला ॥४॥*
*देवीमाते 'मंगळागौरी' फेर धरिला तुजसमोरी। संसाराला*
*दीर्घायु दे, मागणे हे पाया॥५॥,*

**संस्कारांची मंगळागौर चला जागवाया ॥**

नाव घेणं, उखाणा रचणे, यांच्या माध्यातूनही आपण संस्कारंची निर्मिती करत असतो. परंतु 'अहो' म्हणण्याचे, नाव घेण्याचं कौतुक हल्ली राहिले आहे का?

पण...सद्या आजूबाजूची परिस्थती निश्चितच आशाजनक नाही. परकीय नाचगाण्यांचा, विचारांचा पगडा आपल्या पुढील पिढ्यांवरही बराच आहे. आपण आपले सांस्कृतिक वैभव घालवून बसतोय.

मंगळागौरीच्या हळदीकुंकवास संध्याकाळी या. रात्री जागरण नाहीचे. कारण सकाळी ऑफिस वगैरे. मला दोन ठिकाणी असे बोलावणे आहे. सध्याचा जमाना हा असा आहे.

*आता अरे-तुरे करण्याच्या जमान्यात,*
*नाव घेण्याचं नाही उरलं,*
*एका पेप्सीत दोन स्ट्रॉ घालून,*
*यांनी नाव घेणही उरकलं॥१॥*
*मुहुर्त महत्त्वाचा नाही,*
*तर पार्लरची वेळ सांभाळणे महत्त्वाचे ।*
*मेकअप खराब होणार नाही,*
*या बेताने लग्नविधी उरकायचे॥२॥*
*लाजायाचा जमानाच संपला, दुपट्ट्यात तोंड लपवायचे*
*तरी कसे? आई-वडीलांची कटकट संपणार,*
*तेव्हा सासरी जायचे वाईट वाटणार तरी कसे॥३॥*
*लग्नाच्या रात्री हॉटेलचं बुकींग दुसऱ्या दिवशी हनीमूनला।*
*रजा फक्त आठवड्याचीच,*

*मग लगेचच जायचं कामाला ॥४॥*

*दोघांनी काम आवरून, परस्पर बाहेर फिरायाला म्हणून जायचे । बाहेरच हॉटेलात जेऊन, रात्री उशीरा घरी परतायचे॥*

*सासू-सासरे वाट बघून, चार घास खाऊन घेतात, उरलं-सुरलं उद्या संपवू असं म्हणत झोपी जातात।*

*आता रात्री जागरण झाल्याने, सुनबाई उशीरा उठतात, आणि सासूबाईंनी डब्यासाठी केलेली भाजी न आवडल्याने नाराज होऊन ऑफीसला जातात॥*

*ऑफिस झाल्यावर दोघं तिच्या माहेरी जातात, ती आईकडे रहाते, अन चिरंजीव एकटेच घरी परतात ४-८ दिवसांनी मुलगा सांगतो, आई, आम्ही वेगळे रहाणार, कारण तिचे वडील म्हणे तिला स्वतंत्र फ्लॅट देणार॥*

*त्यांच्या आईचे मन गलबलते, पण वडील मात्र शांत, 'वेळ्वरच हे घडते आहे' म्हणतात होऊ नको क्रांत ॥ आपल्या जमाना संपला आहे, आता येईल ते फक्त पहायचे।*

*अग, आपल्याला वृद्धाश्रमांत नाही पाठवलं, यातच समाधान मानायचे॥*

यावरून आपण आपली शाश्वत नीतीमूल्ये गमावून बसतोय की काय? कुटुंब व्यवस्था मोडकळीस येतेस की काय ? अशी शंका येते. पण भारतीय स्त्री ही आशावादी आहे. आपण साऱ्याजणी सर्व परिस्थितीवर मात करून यशस्वी होऊ.

हे देवीमाते, आम्हाला शक्ती दे, बुद्धी दे हीच प्रार्थना॥

"सा कला या विमुक्तये" - हे संस्कार भारतीचे ब्रीद वाक्य आहे. संस्कार भारती या अखिल भारतीय संस्थेने कलाक्षेत्र सुसंस्कारित करण्याचे अतिशय कठीण कार्य प्रतिकूल परिस्थितीत 'व्रत' म्हणून स्वीकारले आहे. कला हे मानवी जीवनाचे भावपूर्ण अलंकरण आहे. लहानांपासून थोरांपर्यंत अगदी प्रत्येकाला आकर्षित करण्याचं सामर्थ्य या कलांमध्ये आहे. या कलांच्या माध्यमातून संस्कार भारतीला छान कार्यकर्त्यांचीही भरती आली आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. साहजिकच शाळा व महाविद्यालयांतून किंवा मंडळांतून अशी शिबिरं घेण्यातचे व हे पारंपारिक खेळ ठरविले आहे. ज्यावेळी आपण खेळ खेळतो त्यावेळी माणसाचे 'मन' आपोआप मोठं होतं स्वत:पुरती मर्यादा रहात नाही. सर्व समवयस्कांबद्दल स्नेहाची भावना निर्माण होते. या स्नेहामधूनच एकमेकांच्या गुणांची ओळख होते. स्नेहाबरोबर कौतुक व आदर या दोन्हींची वाढ होते. लहानपणापासून या खेळांचा प्रारंभ करण्यामागचा उद्देश खेळ शिकणे हा आहेच पण 'आपले पणाचे शिक्षण' होणे हाही आहे. या विद्यार्थी दशेत 'मन' मुळात स्वच्छ असते. त्या काळात हे संस्कार झाले तर आपली पुढील मार्गक्रमणा होण्यास चांगली मदत होते.

*पहा रे, पहा रे परमेश्वराची लीला ॥ धृ॥*
*वरती शोभे विशाल अंबर,*
*बिनखांबाचा घुमट मनोहर*
*खाली हिरवी-हिरवी चादर, सुंदर वनमाला ॥*
*या गगनाच्या नील छतावर,*
*चमकदार चंद्राचे झुंबर,*
*कोटी-कोटी तारका चमकती, जणू दिपमाला॥*

विश्वाचं हे विशाल अंगण परमेश्वराने आपल्या सर्वांना आपली जीवनयात्रा करायला आंदण दिलेले आहे. आणि या यात्रेतील आपलं भांडवल म्हणजे आपलं हे 'निसर्गदत्त' सुंदर शरीर. हे पारंपरिक खेळ - खेळताना आम्हा सर्व भगिनींना कितीतर गोष्टी शिकायाला मिळाल्या. हल्लीच्या शब्दांत सांगायचे म्हणजे "इव्हेंट मॅनेजमेंट" चा जणू काही कोर्सच झाल्यासारखे वाटले. हे खेळ आम्ही

खरोखरी १६ दिवसात १६ जणींनी बसविले. खेळ खेळताना इतकी मजा यायची की, पहिल्या दिवशी १५,१६ जणी, दुसऱ्या दिवशी ८ जणी, तिसऱ्या दिवशी १० चौथ्या दिवशी २० जणी, पाचव्या दिवशी २५ जणींची उपस्थिती होती. कारण सुरुवातीला सर्वांचे पाय दुखणे, अंग दुखणे उड्या मारता येईनात, पाउल दुखणे वगैरे प्रकार झाले, पण घरी चैन पडत नव्हते. कारण हा व्यायाम किती छान वाटतोय हे प्रत्येकीला जाणवले व म्हणू लागल्या की, "अगं काय हलकं वाटते, आपण वरचेवर जमूयांत ग।"

एक म्हणतो, "पूर्वी एखाद्या मगंळवारी कुठे बोलावणे नसले की वाईट वाटायचे,"

दुसरी म्हणते, "आम्ही पूर्ण रात्रभर सगळे मंगळवार जागायचो व ऑफसमध्ये मस्टरवर जवळजवळ झोपतेच सही करायचो!"

तिसरी म्हणते,"जिला बोलावणे असेल तिला आम्ही सर्व "आम्हालाही त्यांना बोलाबायाला सांग ना!

पुढची म्हणते, ह्यावर्षी आमच्या सोसायटीत फक्त हळदीकूंकच आहे, रात्रीचे जागरण नाही. कारण आता सून जाणार आहे परदेशी असे विविध सूर ऐकू येत होते.

आम्हां सर्व हौशी सख्यांची संख्या आपुलकीने, प्रेमाने उत्सफूर्तपणे वाढत होती. त्यामुळे संघटना "शक्ती" वाटत होती. या आत्मीयतेच्या, प्रेमाच्या नात्यातच देवी प्रसन्न झाल्याचा भास होत होता.

घरातील एखादी खोली, हॉल, गच्ची, अंगण जिथे जशी जागा मिळेल तिथे आम्ही खेळ शिकत होतो, शिकवत होतो. एखादा खेळ, एखादी टाळी जमत नसली तरी सांभाळून घेऊन पुढे चला, हे संसारातील मोठे तत्त्वज्ञान येथे शिकत होतो. सगळ्याजणी एकत्र खेळताना "तू कोण? मी कोण? कोण कोणाची कोण? हे सर्व विसरून जायचो. पूर्वीच्या काही सासर-वाशिर्णीना व माहेरवाशिर्णींना या खेळांचे जगारणांचे अप्रूप का वाटत असेल? याचा अनुभव आम्ही महिलांनी ह्या काळांतही अंशत: का होईना पण घेतला. भरपूर खाली वाकून खेळण्याच्या प्रयत्नांत, हास्याची कारंजी मात्र उंच उंच उडत होती. आणि त्यांत मुसळधार पाऊस असायचा. दोन तास कसे जायचे कळत नसे

हल्लीच्या खेळाप्रमाणे आपल्या ह्या पारंपरिक खेळांना भांडवल असे काय हो लागते? पैसा असा कितीसा लागतो? खरं म्हणजे, निसर्गातीलच पत्री, फुले आपण निसर्गाला भक्तीभावाने अर्पण करत असतो. पत्ते, कॅरम, शटल, रॅकेट नेट, ठराविकच पोशाख वगैरे काहीच लागत नाही. खेळताना वयाची, जाड-बारीक उंच ठेंगणी, जात-धर्म, कसलीही अट नाही. देणं नाही - घेणं नाही, स्पर्धा नाही, अंपायर नाही, सरळसोट दणदणीत खेळ आणि खेळ यात फक्त लागते ते म्हणजे आपली ईच्छा.

आपल्या घरातील वडीलधारी मंडळीच्या प्रकृतीकडे बघितले की जाणवते या मंडळींनी भरपूर खेळून, भरपूर कामं करून शरीरसंपदा कशी मिळवली आहे ती. या खेळात शरीराला डोक्यापासून पायापर्यंत, सर्वांग सुंदर व्यायाम, आपल्याला एखाद्या 'जीम' मध्ये न जाता व भरपूर पैसे खर्च न करता मिळतोय ही जाणीवच मनाला सुख देते व आपलं "जुन ते अस्सल सोन", जे घरबसल्या मिळतंय तेच आपण धुडकावतोय? याची खंत वाटते. आता हे 'मंगळगौरीचे खेळ' आपल्याला थोड्या वर्षांनी परदेशी बायका शिकवतील की काय? असा विचारही मनात येतो.

नवे चांगले जरूर घेऊ, पण जुनंही काही अंगीकारू. म्हणून या खेळात सहावारी किंवा नऊवारी साडीच नेसायची, पंजाबी सूट घालायचा नाही, हे आमचे आम्हीच सर्वांनी ठरवले, हा एक नियमच स्वत:ला घालून घेतला

पृष्ठ क्र. ४० वर

# कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा -धावता दृष्टिक्षेप (लेखांक १)

*कथेच्या व प्रामुख्याने मराठी कथेचा विचार करताना, याबाबत संशोधन करताना केलेले हे लेखन आहे. या संशोधनाचे मार्गदर्शक प्रसिद्ध समीक्षक कै. प्रा. ल. ग. जोग हे होते. या विषयाची संदर्भसूची बरीच विस्तृत आहे. ती शेवटी देण्यात येईल. - संपादक*

आदिमानवाला जे अनेक शोध लागले त्यात शब्दोच्चार व भाषा हे शोध अत्यंत महत्त्वाचे होत. किंबहुना एकूण मानवी समाजाची जडण घडण मूलत: या शोधातून झाली. स्वरयंत्रातून येणाऱ्या आवाजाला शब्दांनी आकार दिला व मानसिक हावभावांच्या आविष्काराला साधन प्राप्त झाले. वस्तुनिर्देश करण्यातून शब्द निर्मिती झाली तरी कालौघात शब्दाला अनेक मूल्ये लाभत गेली. यामुळे शब्दांचे सामर्थ्य केवळ एखादी वस्तू दाखविणे एवढ्यापुरतेच मर्यादित न रहाता शब्द माध्यमातून माणूस आपल्या प्रतिक्रिया नोंदवू लागला, आपल्याला आलेला अनुभव सांगू लागला, आपल्या भावना प्रकट करू लागला. अनुभव सांगून, दुसऱ्याचे अनुभव ऐकून संवाद साधण्याच्या या उपजत वृत्तीतून कथा जन्माला आली, कल्पकतेची जोड अनुभवांमुळे तिला मिळत गेली. इतिहासपूर्व काळातील या कथेचे स्वरुप साहाजिकच मौखिक होते. अनुभवास आलेले विश्वाबद्दलचे कुतूहल, निसर्गचमत्कारांनी भारावलेले मन, जीवनात नित्य नव्याने येणारे विविध अनुभव हे या कथेचा विषय झाले.

कथ् म्हणजे सांगणे या संस्कृत धातुरूपावरून कथा (Story) हा शब्द अस्तित्वात आला तो फार पुढे. आदिकथा ही आजच्या रूढ अर्थाने कथा नव्हती तर ती कहाणी होती - fable होती. संवाद साधण्याची वृत्ती ही एक मानसिक गरज होती. परस्पर संबंधातून निर्माण होणाऱ्या व्यवहारात संवाद ही आवश्यकताच होती. संवाद साधणे यात अपरिहार्य दोन क्रिया गृहीत असतात, त्या म्हणजे सांगणे व ऐकणे (आणि/किंवा ऐकणे व सांगणे). त्यामुळे साहाजिकच या दुहेरी प्रक्रियेतून कहाणीचा उद्‌गम झालेला दिसून येतो. म्हणूनच परस्परांत संवाद साधण्याच्या मूलप्रवृत्ती इतकीच गोष्ट वा कहाणी सांगण्याची व ऐकण्याची वृत्ती सनातन व मूलभूत स्वरुपाची आहे.

संवाद साधावयाचा, काही तरी सांगावयाचे या उर्मीमुळे बहुतेक भाषांतील प्राचीन साहित्याचा - घाट कोणताही असला तरी पाया हा कथा तत्त्व प्रधान असल्याचे दिसते. "A mere glance at the history of literature reveals their narrative foundations." याचे प्रत्यंतर प्राचीन साहित्यातील कोणताही घाट विचारात घेता दिसते. असे असेल तर कथा वा कहाणी आणि इतर घाट यातला फरक काय? तर हा फरक आविष्कार पद्धतीत आहे, केवळ कथा प्राधान्य असणे हे कथेचे व्यवच्छेदक लक्षण नसून कथा वा कहाणी होण्याकरिता इतर काही लक्षणे आवश्यक आहेत. या मुद्याचा प्रस्तुत प्रकरणात विचार आविष्काराच्या - आकारासंदर्भात येतो. आपल्या आविष्काराला आकार शोधणे ही देखील एक मूलभूत आवड आहे आणि त्यातून कथनाला कहाणीचा घाट प्राप्त झाला आहे. अर्थात प्राचीन काळात ही जाणीव नव्हती. मौखिक परंपरेतून हे साधले गेलेले आहे.

## लोककथा - विकासातील टप्पे

कहाणी किंवा कथा सांगणे/ऐकणे ही माणसाच्या मूलप्रवृत्तीतील एक प्रवृत्ती आहे हे पाहिल्यानंतर या प्रवृत्तीच्या विकासातील महत्त्वाच्या टप्प्यांचा विचार येतो. (मराठी कथा : उद्‌गम आणि विकास) टप्प्यांना अनुलक्षून काही निष्कर्ष मांडता येतात. लोककथेच्या विकासातील तिच्या प्रयोजन व स्वरुपातील बदल या निष्कर्षावरून समजून येतात. हे निष्कर्ष थोडक्यात पुढील प्रमाणे -

१) **दैवत कथा** - निसर्ग चमत्कारांनी दिसून गेलेल्या आणि मानवी समाजाने निसर्ग चमत्कारामागील कारणांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांत निसर्गातील अद्‌भुततेची कारणमीमांसा करताना देव, दानव, विश्वोत्पत्ती, विश्वप्रलय, भुतेखेते या कल्पनांवर आधारित कथानक असणाऱ्या कहाण्यांचा जन्म झाला. या मानवी लोककथा संस्कृतीतील आद्यकथा होत. या कथांत केवळ आत्माविष्कार, जीवनावरील भाष्य होते. ही मानवी समाजाच्या संस्कृतीतील प्राथमिक अवस्था असल्याकारणाने मनोरंजन, समाजप्रबोधनादी प्रयोजनांचा प्रत्यक्षपणे या कथेत समावेश नव्हता. संस्कृतीच्या विकासात गरजेनुसार कथेची प्रयोजने बदलत गेली असल्याकारणाने या लोककथांना ही प्रयोजने बसणे हे अत्यंत साहजिक होते.

२) **धार्मिक व नीती कथा** - मानवी समाजाचे जीवन जसजसे सुस्थिर होत गेले तसतशा जीवन व जीवन व्यवहाराबाबतच्या कल्पना बदलत गेल्या. 'समाज' जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या काही गोष्टी रूढ होण्यास सुरुवात झाली. धर्मांचा हा कालखंड सीमित करता येणे हे दुर्धर असले तरी जगात आज रूढ असलेले, नामशेष झालेले बरेचसे धर्म या सुस्थिर समाज जीवनाच्या काळात उदयास आले. तत्त्वे रूढ झाली हिंदु, बौद्ध, जैन, ख्रिस्त, मुस्लिम वगैरे धर्म रूढ होण्याच्या अनेकानेक वर्षांचा हा कालखंड काळ म्हणून बराच मोठा असला तरी माणसाच्या या विकास टप्प्यात कथेचे स्वरूप बदल होण्यामागे 'धर्म' कारणीभूत ठरले.

धर्म प्रवर्तनांच्या या काळात कहाणीच्या प्रयोजनात भर पडली. केवळ जीवनभाष्ये करून निसर्ग दैवतांच्या महिमा गाण्याबरोबरच कहाणी धर्मप्रसाराचे साधन बनली. (Story telling took its place as a part of tribal entertainment) या विधानात कहाणीच्या सामूहिकतेचा भाग स्पष्ट केल्यानुसार अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचून धर्मप्रसार साधण्याच्या दृष्टीने लोककथा वापरली जाणे हे क्रमप्राप्त होते. त्यामुळे कहाणीला या दुसऱ्या टप्प्यात प्रचाराचे साधन म्हणून मान्यता मिळाली. प्राणिकथांच्या मिषाने मनावर तत्त्वज्ञानातील तत्त्वे बिंबविण्यास सांगितल्या गेलेल्या पंचतंत्र, हितोपदेशातील कथा, बौद्ध धर्मातील जातककथा, बायबलमधील कथा, जैन धर्मातील चूर्णिका या लोककथा धार्मिक कथांच्या टप्प्यातील कथा होत.

आदिमानवाच्या दैवत कथा व प्रस्तुतच्या धर्मकथा यामध्ये आणखी एक टप्पा येतो, तो अद्‌भुत कथांचा होय! सामूहिक मनोरंजनाच्या दृष्टीने असणारे लोक कथेचे महत्त्व पाहता हा टप्पाही महत्त्वाचा आहे. दैवतकथांतील जीवन भाष्याचे प्रयोजन बोथट होत जाऊन या टप्प्याचे कहाणीचे कार्य केवळ मनोविनोदनापुरते मर्यादित झाले. अद्‌भुत स्वरुपाच्या विचारांचा आविष्कार साधून केवळ मनोरंजनपर अशा या कथा होत्या. यात परीकथा व प्राणिकथांचा समावेश होतो.

३) **मध्ययुगीन कथा** - बोधकथा व अद्‌भुतकथा, परीकथा, प्राणिकथा यातील अद्‌भुत. चमत्कृती सामावून लक्षणीय ठरलेली चमत्कृतिपूर्ण कथा अशा दोन प्रकारच्या कथांचे प्रवाह या कालखंडात समांतरपणे गेल्याचे दिसतात. चमत्कृतिपूर्ण कथा प्रामुख्याने मनोरंजनासाठी होती तर बोधकथा ही उद्‌बोधनासाठी वापरली गेली. तिचा उपयोग

धार्मिक व नैतिक शिकवणुकीसाठीच होई. या काळातील कथेवर गूढतेचे आवरण होते. ऐतिहासिक व्यक्तिचित्रणातही गूढता होती. वास्तव जीवनाकडे अद्यापि कथा वळलेली नव्हती. या कालखंडात कहाणीचे परिवर्तन गोष्टीत झाले, कहाणीचे स्वरूप सैल, अघळपघळ असे होते तर गोष्ट अधिक घट्ट बांधणीची असे.

४) **लिखित कथा** - आज उपलब्ध असलेली अतिप्राचीन लिखित कथा म्हणजे ख्रिस्तपूर्व २७०० ते ४००० वर्षांपूर्वीची मिसर देशात पॅपिरस या प्राचीन प्रकारच्या कागदावर लिहिल्या गेलेल्या कथा होय! संशोधकांनी या कथांचा उल्लेख Tales of the magician असा केला आहे. लिखीत स्वरूप प्राप्त झाल्यावर तिला कलात्मक घाट देण्याचे प्रयत्न हे या आद्य लिखित (उपलब्ध) कथांपासून ते अरेबियन नाईटस् पर्यंत चाललेले असले तरी ढोबळपणे या कथांचा साचा सुखान्ताकडे नेणारा, नायक नायिका, मार्गातील अडथळे वगैरे मार्गांनी विकसित होणारा असा ठराविक होता. कथेचे स्वरूप लिखीत होते तरी त्यावरील मर्यादा अधिक होत्या. मुख्य म्हणजे सर्वच कथा या लिखीत स्वरूपात आणता येणे हे साक्षरतेचा अभाव, मुद्रणशोधाचा अभाव यामुळे अशक्य होते. साहजिकच या परंपरेला मौखिक परंपरा ही समांतरच होती. किंबहुना लिखीत स्वरुप प्राप्त होतानाही कथेची कथन-श्रवणीयता कायमच राहिली होती. यामुळे लिखित स्वरुपामुळे होणाऱ्या परिणामांवर मर्यादा या होत्याच. मराठीपुरते सांगावयाचे तर लिखित असूनही वाचकसंख्येच्या अभावमुळे हरिभाऊंच्या काळापर्यंत कथा ही श्रवणीय होती.

## मराठी लोककथा

लोककथा वाङ्मय मुख्यत: तीन प्रकारांनी वाढत गेले. स्त्रिया, कथा पुराणांतील आख्याने व धंदेवाईक कथाकार-भाट यातील स्त्रियांचे साहित्य अत्यंत लक्षणीय आहे. समाजाच्या सार्वजनिक जीवनव्यवहारात स्त्रीला फारसा सहभाग नसला तरी व्रतवैकल्ये, सणवार, नातवंडांचे मनोरंजन, उपदेश अशा विविध हेतूंनी स्त्रियांच्या लोककथांचा विकास झालेला आढळतो. मराठीच्या प्राथमिक अवस्थेपासून ते ब्रिटीश आमदानीपर्यंतच्या विशाल कालखंडात विकास पावलेल्या या कथांत आटपाटनगराच्या, काऊचिऊच्या, सोळा सोमवारांच्या नागपंचमीच्या अशा अनेकानेक विषय येऊन जातात. या लोककथा मौखिक परंपरेने चालत आल्या. समाजाच्या सर्व स्तरांतील सर्व प्रकारच्या स्त्रियांनी या साहित्यात वाढ केली.

दुसरा प्रकार कथापुराणे व कीर्तनांचा. इतिहास व पुराणांतरीच्या अनेक आख्यानोपाख्यानांच्या साहाय्याने कीर्तनकार अर्धशिक्षित समाजापर्यंतच्या त्यातील कथानक पोहोचवीत. याबरोबरच स्वत:च्या टीकाटिपण्णीची नोंदही करीत.

भाट पदरी बाळगून आपले मनोरंजन करून घेण्याच्या श्रीमंतांच्या हौसेपायी हे भाट कथा निर्मिती करीत व आपले चरितार्थ चालवीत. पूर्वजांच्या शौर्य कथांचे गुणगान करणे हे त्यांचे प्रमुख कार्य. महाराष्ट्रात यांना 'चित्र कथये' म्हणून ओळखीत राजेरजवाड्यांच्या चित्रशाळेतील पूर्वजांची चित्रे दाखवून त्यांच्या शौर्यावर हे कथा रचून सांगीत.

भारतीय लोककथेचा विपुलतेचा वारसा मराठी साहित्यालाही मिळाला. यात दैवतकथा, दंतकथा, प्राणिकथा या अनेकविध कथांचा समावेश होता. खास दैवतकथांत विठोबाच्या कथा प्रामुख्याने प्रातिनिधिक होत्या. महाराष्ट्रातील लोककथांचे गुणाढ्याने आपल्या बृहत्कथेत संकलन केले. अर्थात याबद्दल मतभेद आहेत. उत्तरेकडील वररुचीच्या संग्रहाचा वारसा गुणाढ्यास मिळाल्याचेही सांगितले जाते. बृहत्कथेतील सर्वांत जुनी व सर्व जागतिक साहित्यात पोहोचलेली कथा चंद्रहास

राजाची. कथाबीज व रचनाबंध कायम राहिलेल्या पण भारतात अनेक प्रातांत भटकलेल्या अनेक कथा एकूण लोकसाहित्यात पुष्कळच आहेत. राजा धिंग माथा शिंग, श्रावण साखळी, पैशाचं झाड वगैरे काही कथा याच भटक्या वर्गातील.

या लोककथांतील प्रेरणा नैसर्गिक व भाषा सहजस्फूर्त आहे. मौखिक परंपरेच्या परिणामत: चटकदार संवाद, वैशिष्ट्यपूर्ण क्रियापदे, सुटसुटीत वाक्ये, दैनंदिन जीवन व्यवहारातील प्रतिमांचा वापर हे या लोककथांचे सहज जाणवणारे विशेष होत. याशिवाय मराठी प्रदेशातील विविध प्रादेशिक बोलींचाही कथेवर परिणाम झालेला दिसतो. या बोलींनुसार भाषेबरोबरच सांगण्याच्या धाटणी ही अनेक प्रकारच्या होत्या. खानदेशी मराठी, वैदर्भी मराठी, मराठवाड्यातील मराठी यासर्व प्रदेशांतील भाषा एकच असली तरी प्रत्येक प्रदेशाची बोली वेगळी होती/आहे व याचा परिणाम कथा सांगण्यावर होत गेला.

## पहिले लिखित कथा साहित्य

मराठीत पहिल्या लिखित साहित्याचा मान बहुश: महानुभावीयांच्या ग्रंथनिर्मितीकडे जातो. त्या आधीचे लिखित, साहित्य ग्रंथस्वरूपात अल्पप्रमाणात उपलब्ध असले तरी महानुभावीयांच्या ग्रंथनिर्मितीचा गुणात्मक व संख्यात्मक आवाका हा या पूर्वीच्या ग्रंथनिर्मितीत नव्हता. महानुभावीयांनी केलेल्या ग्रंथनिर्मितीत पंचवार्तिक सारखा व्याकरणातील, ग्रंथही आहे. पद्यरचनेबरोबरच त्यांच्या साती ग्रंथाचे स्थान एकूण साहित्य इतिहासात महत्त्वपूर्ण आहे. या गद्य ग्रंथनिर्मितीतच मराठीतील पहिली लिखित स्वरूपातील कथा दिसून येते.

या कथेचा आढळ होतो तो म्हाइंभटाने लिहिलेल्या चक्रधर स्वामींच्या चरित्र ग्रंथात. 'असन्निधानीच्या स्मरणानंदात मिळणाऱ्या स्वान्त सुखांसाठी केलेला लीळांचा संग्रह' असे या चरित्रग्रंथाचे स्वरूप असल्याने त्यात कोणताही प्रचारकी अभिनिवेश, साहित्यनिर्मितीची जाणीव आलेली नाही. सहजगत्या आठवणी एकत्रितपणे गोवलेल्या दिसतात. या आठवणीत चक्रधरांच्या जीवनातील अनेक प्रसंग कथारूपाने सांगितलेले आहेत. त्यामुळे कथात्मकता आलेली आहे. प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी आपल्या लीळाचरित्र एक अभ्यास या पुस्तकात लीळांची वाङ्मयीन वैशिष्ट्ये स्पष्ट करून सांगितली आहेत. चरित्रात्मकता लक्षात घेता हा ग्रंथ ललितेतर होतो. यामुळे ग्रंथाचे वर्णन प्रा. व. दि. कुलकर्णी पुढीलप्रमाणे करतात, "--मराठीतील आद्य ललित-ललितेतर-गद्य ग्रंथ होय!"

लीळांचे साहित्यिक रूप मुख्यत: संवादप्रधान वृत्तकथनात्मक आहे. पण काही वेळा या वृत्तकथनालाच छोट्या कथेचे स्वरूप आलेले दिसते. 'एकांक' मधील बहुतेक लीळा या अशा आहेत. 'ससीक रक्षण' (२३)'गोपाळांतु खेळु' (३३) 'भक्ता भेटि' (१४) 'द्विजगोरक्षण (४०) या व अशा अनेक लीळातून अनेक प्रसंगांतून विकसित होणारी कथा आपल्याला दिसते. दृष्टांत पाठात तर प्रत्यक्ष कथाच दृष्टांत म्हणून दिलेली आढळते. त्यामुळे कथा साहित्याचे विशुद्ध रूप आपल्याला या गोष्टींतून दिसून येते. कठियाचा दृष्टांत (दृ. ९४), हत्तीचा दृष्टांत (दृ. ४३) सुरीयेचा दृष्टांत (दृ. ४०) वगैरे अनेक दृष्टांतातून हे कथावाङ्मय विखुरलेले आहे. "लीळाचरित्राने मराठीतील कथावाङ्मयाला मुख परंपरेतून लिखित स्वरूपात आणले --- लीळाचरित्र हे मराठी कथावाङ्मयाचे उगमस्थान आहे" अशा शब्दात प्रा. कुलकर्णी यांनीही लिखित कथेचा मान लीळाचरित्राकडे दिल्याचे दिसते.

उपनिर्दिष्ट कथांशिवाय वास्तव जीवनचित्रण करणाऱ्याही अनेक कथा लीळाचरित्रात दिसून येतात. समाजाच्या सर्व स्तरातील जीवनाचे वास्तव चित्रण या लीळांतून दिसून येते. अशा काही लिळांची उदाहरणे म्हणजे, जोगी ब्रह्म उपदेश कथन (ली. ४१), मोनिकर सुखानुवाद

(४०५) गोलडी सींग भेडवणे (४११) इत्यादी होत.

कथात्मकता असणाऱ्या या लीळातून कथेत आढळणारी बहुतेक वैशिष्ट्ये त्याही काळात होती, असे आढळते. कथेतील प्रसंगात दृश्यात्मकता ही अत्यंत लक्षणीय होती. चलत् चित्रपटाप्रमाणे, नाट्यपूर्णरीतीने यातील घटना डोळ्यासमोर उभ्या राहू शकतात. तसेच व्यक्तिचित्रण, व्यक्तिमत्त्व चित्रणातील बारकावे, चमत्कार आदी विशेषांमुळे या कथा मनाची पकडही झटकन घेऊ शकतात.

## महानुभावेतर कथाविचार

''मराठी कथासाहित्याचा अभ्यास करता असे दिसते की, प्राचीन कथात्मक साहित्य अद्याप बऱ्याच प्रमाणात असंग्रहीत आहे. त्याचप्रमाणे या लोककथांचा अभ्यास देखील अद्याप प्राथमिक अवस्थेत आहे.''

आठव्या शतकानंतर महाराष्ट्रातील व्हराड व मराठवाडा या प्रदेशात जैन ग्रंथ रचना करणारे अनेक ग्रंथकार होऊन गेले. अवतारी पुरुषांच्या कथांचे संग्रह करून धर्मप्रसार करण्याची जैनांची परंपराच महानुभावीयांच्याही चरित्रग्रंथात दिसून येते. यावरून जैन प्राकृताचा आढळ महानुभावीयांच्या आधीचा, हे दिसून येते. महानुभावीय साहित्यानंतर बराचसा काळ हा केवळ पद्य निर्मितीचा होता. किंबहुना ''गद्य साहित्याच्या उपलब्धीचे अल्प प्रमाण हे निर्मितीच्या अभावाचे द्योतक नसून ते अनुपलब्धीचे निदर्शक आहे.'' या अन्वयार्थाचा विचार करता महानुभावेतर गद्य साहित्य न आढळण्यामागील काही कारणे ध्यानात येतील. खुद्द ज्या महानुभावीय लीळांचा व इतर चरित्र ग्रंथाचा विचार वरील विवरणात अपेक्षित आहे, त्याशिवाय एक अजून परंपरा याच साहित्यात होती. अर्थात दोन्ही परंपरांमागील प्रेरणा एकच होती. कथात्मक घाट प्राप्त झालेले - ज्या ग्रंथात जनसामान्यांत रूढ असलेल्या कथांचा प्रसंगोपात समावेश आहे. - चरित्र ग्रंथ ही एक परंपरा व दुसरी पंडिती ग्रंथांची परंपरा.

यानंतर पद्यरचनेचे प्राबल्य अधिक होते. अनेक चरित्रकाव्य रामायण महाभारतातील आख्यानांवरील पद्यरचना, स्वयंवरकाव्ये, धार्मिक व तत्त्वज्ञानपर कविता अशा बहुविध पद्य रचना नंतर झाल्या, तरी गद्य साहित्याचा आढळ नंतर होत नाही. महानुभावीच गद्य चरित्र ग्रंथ निर्मितीनंतरच्या कालखंडात सतराव्या शतकातील कराडकर स्वामींच्या चरित्रग्रंथाबद्दल श्री. रं. कुलकर्णी म्हणतात, ''गद्यात साधुसंतांची चरित्रे लिहिण्याची प्रथा महानुभावेतर साहित्यात केव्हा सुरू झाली हे निश्चित करण्यास आज तरी पुरेशी साधने उपलब्ध नाहीत. त्यामुळे कराडकर स्वामींचे चरित्र हा अपवाद मानावयाचा की रूढ असलेल्या पण अनुपलब्ध असलेला गद्य परंपरेचा तो शके १६८३तील आविष्कार समजावयाचा हा प्रश्नच पडतो.'' त्यामुळे कथा प्रधान साहित्याची प्रामुख्याने सुरुवात जशी महानुभावीय चरित्र व इत्तर ग्रंथात दिसून येते तसाच त्याचा शेवटही या मधल्या कालखंडापुरता याच साहित्यात आहे असे निदर्शनास येते.

## बखर साहित्य

मराठीत मुळातच आच असलेल्या गद्य साहित्य विचारात नंतर बखर साहित्याचा टप्पा महत्त्वाचा आहे. या कालखंडातील कित्येक चरित्र ग्रंथही वर्गीकरण करताना बखर वाङ्मयात गोवले गेले आहेत. यात हनुमंत स्वामींची बखर (समर्थ चरित्र), जयराम स्वामी वडगावकर यांची बखर अशा विविध बखरी या चरित्र ग्रंथ होत. याशिवाय भाऊसाहेबांची बखर, चिटणीसांची बखर यासारख्या बखरी एकूण बखर कालखंडाच्या मागेपुढे अस्तित्वात आल्या.

सोळा-सतराव्या शतकातील या चरित्रगद्य ग्रंथ निर्मितीमागील कारण परंपरा व महानुभावीय चरित्र ग्रंथांमागील कारण परंपरा यात साहाजिकच भेद आहे. बखर

साहित्य विकसित होत असतानाच गद्य ग्रंथांची लोकप्रियता वाढली.

महानुभावीय चरित्र ग्रंथनिर्मिती मागे अवतारी पुरूषाचे असिन्निधानी स्मरण करून ज्ञानप्राप्ती करून घ्यावयाचा हेतू प्रकट अप्रकटपणे होता. या सोळा सतराव्या शतकातील गद्य चरित्र ग्रंथ निर्मितीमागील प्रेरणा संतचरित्राचे, संतांचे गुणगान एवढी होती. त्यामुळे या चारिग्रंथातील परंपरा ही महानुभावीय चरित्र ग्रंथापेक्षा वेगळी होती.

महानुभावांचे साहित्य पंथप्रेरणेतून झालेले असल्याने प्रसाराचे एक साध्य या ग्रंथांना साधावयाचे होते. त्यामुळे महानुभावीय चरित्रग्रंथांचा व त्यातील निवेदनाचा घाट लोककथांचा होता. त्याशिवाय चरित्रविषय असलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा व तत्त्वज्ञानाचा प्रसार साधणे कठीण होते. उलट सोळा सतराव्या शतकातील चरित्र ग्रंथांचा घाट बखरींनी विकसित केलेल्या शैलीचा आहे. केवळ परमार्थ साधना करणारांनी प्रमाणत: भौतिक वाटणाऱ्या बखरीतील विषयांपेक्षा निराळा विषय पण बखरींच्या प्रौढ व पल्लेदार भाषेत या चरित्र ग्रंथातून मांडला.

बखरींचा इतिहास हाही तेराव्या शतकातील रामदेवरावाच्या बखरीपासून सुरू होतो. बिंबस्थान उर्फ ठाण्याची बखर याच शतकातली असावी असेही एक मत दिसून येते. यानंतर राक्षसतागडीच्या लढाईची बखर (१५ वे शतक) दिसून येते. वर्णन करीत असता प्रसंग जसाच्या तसा उभा करण्याचे सामर्थ्य या बखरींच्या प्रसंगचित्रणात आहे. सरळ साध्या पद्धतीचे निवेदन, संवादांचा वापर करून प्रसंगातील नाट्य हेरण्याचे तंत्र, कधी चमत्कृती व अतिशयोक्तीचा वापर या शिवकालीन व पेशवेकालीन बखरींच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांमुळे बखरीची जवळीक कादंबरीशी अधिक असलेली दिसते. होळकर शैली, नाना फडणविसाची बखर या अशा कादंबरी प्रकाराशी जवळीक साधणाऱ्या बखरी होत. या व वर उल्लेखिलेल्या चरित्र बखरीतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. 'खबर' म्हणजे बातमी, या उर्दू शब्दाचे बखर हे अपभ्रष्ट स्वरूप असल्याने युद्ध प्रसंगावर आधारलेला विविध बखरींमागे वृत्तात्मकता (Reportuge) ही प्रेरणाअधिक प्रबळ आहे, तर उपर्निदिष्ट चरित्रबखरींचा हेतू हा संतमहात्म्याचा परिणाम साधणे, चरित्र लिहिणे, हा आहे. तथापि कादंबरी व कथा यातील निकटचे नाते, लक्षात घेता हे साहित्य हे कथाविचारात महत्त्वाचा टप्पा ठरते. या प्रकारातील कथामूल्ये (Story elements) ही महत्त्वाची आहेत. याचे प्रत्यंतर भाऊसाहेबांच्या बखरीतील पुढील प्रसंगावरून येईल, ''इकडे भाऊसाहेबांचे युद्ध होतच होते. भाऊसाहेबांची स्त्री पार्वतीबाई तेथेच होती. अंबारीस अंबारी तटली होती. युद्धाचे धुंदीत घाबरी होऊन आवघे लक्ष पुढेच होते. तो एकाएकी अंबारीत-विश्वासराव यांचा मुडदा पाहिला आणि बाईंनी माहुतास पुशिले की, ''हा मुडदा कुणाचा आहे?'' त्याने उत्तर केले की, ''विश्वासरावसाहेब ठार झाले.''--- वगैरे.

(क्रमश:)

**मोहन पाठक**
**ठाणे**

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

चित्रपावली

# ग्रेड परीक्षांचे बदलते रूप

चित्रपालवी या सदरातील लेख आवडत असलेल्यांपैकी प्रतिक्रिया अनेक कला शिक्षक देतात. त्यांनी आपल्या प्रतीक्रिया लेखी कळवाव्यात म्हणजे प्रसिद्ध करण्यात येतील. या लेख मालिकेतील पुढील लेख आहे 'ग्रेड परीक्षांचे बदलते रूप' - संपादक

शालेय स्तरावर चित्रकला विषयाला दिले जाणारे महत्त्व अत्यल्प असते. खरे तर हा मुलांचा आवडता विषय. पण चित्र काढणे म्हणजे अभ्यास करणे नव्हे. हा पालकांचा दृष्टिकोन. कित्येक पालक आपल्या मुलांना घरी चित्र काढू देत नाहीत. आजच्या या जाहिरात युगात चित्रकलेचे महत्त्व व पुढील उपलब्ध संधी याबद्दलची पुरेशी माहिती पालकांना नसते व ती करून घेण्याचे कष्टही पालक घेत नाहीत.



चित्रकला विषयात पारंगत स्तर गाठण्याचा पहिला टप्पा म्हणजे ग्रेड परीक्षा. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्व अबाधित असूनही या परीक्षांकडे पालक, शाळा, शासन अशा तिन्ही स्तरावर केले जाणारे दुर्लक्ष अनाकलनीय आहे.

या परीक्षा १८८० साली सुरू झाल्या. इतक्या प्रदीर्घ कालावधीपर्यंत अव्याहतपणे चित्रकला परीक्षा घेण्याचे कार्य महाराष्ट्र राज्याशिवाय अन्य कुठेही झाले नाही. या परीक्षा सुरू करण्यामागचे उद्देश -

- विद्यार्थ्यांमध्ये चित्रकलेविषयी आस्था निर्माण करणे.
- उत्तम कलाभिरूचीची जोपासना करणे.
- विद्यार्थ्यांच्या मनात कलेच्या उत्कर्षासाठी व स्वत:चा विकास करण्यासाठी मानसिकता जपणे, त्याचा विकास करणे.
- कला रसग्रहण क्षमतेचा विकास करणे.

अर्थात ही उद्दिष्टे कलेपुरतीच मर्यादित नाहीत तर दैनंदिन जीवनातही सौंदर्याचा आस्वाद घेऊन जीवन सुसह्य करण्याचा प्रयत्न करणे हेही उद्देश आहेत.

पण आजची परिस्थिती वेगळी आहे. आज महाराष्ट्रात कलेचे 'कलेवर' होण्याची वेळ आली आहे. इतर राज्यात मात्र कलेला आणि कलाकारांना मान मिळतो. मध्यंतरी असे वाचनात आले की मध्य प्रदेशात तर इंटरमिजिएट परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर सरकारी नोकरीत पगारवाढ मिळते व नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळते, असे महाराष्ट्रात होईल?

आज या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली, पण दर्जा घसरत चालला आहे. कदाचित काही शाळांमध्ये ९ वी / १० वी साठी चित्रकला विषयच नाही त्यामुळे असेल आणि आता तर असे ऐकिवात येते की याही परीक्षेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो.



प्रत्येक कलाशिक्षकाला आपल्या विद्यार्थ्यांची क्षमता माहीत असते. त्यानुसारच त्यांच्याकडून सराव करून घेऊन निकालाबाबत अपेक्षा बाळगली जाते. पण प्रत्यक्षात मात्र निकालानंतर शिक्षकाला व त्या विद्यार्थ्याला जबरदस्त धक्का बसतो. कारण त्या शिक्षकाचा A ग्रेड मिळविणारा विद्यार्थी चक्क नापास झालेला असतो तर वर्गात अनियमितपणे काम करणारा, सराव न करणारा बारंवार गैरहजर राहणारा विद्यार्थी (सुमार दर्जाचा) मात्र A ग्रेड मिळवून पास होतो. याचे काय गौडबंगाल आहे न कळे. मला वाटते सध्या घेतल्या जाणाऱ्या शासकीय परीक्षा या छंद किंवा हौसेखातर किंवा 'परीक्षा घेतल्या' एवढ्याचसाठी घेतल्या जातात असे दिसते. परीक्षांची फी तिप्पट झाली पण पर्यवेक्षकाला मिळणारे मानधन दिवसाला फक्त १० रू. परीक्षा झाल्यावर विद्यार्थ्यांचे प्रत्येकी ६ पेपरचा सेट करण्यासाठीचे मानधन ५ पैसे (प्रत्येक सेट मागे). आले ना हसू?

पूर्वी परीक्षेचे फॉर्म्स शाळेत येत, आता मात्र आम्हाला किंवा केंद्रावरील शिपायाला ते जाऊन आणावे लागतात. तसेच परीक्षेचे पेपर्सही (प्रश्नपत्रिका) केंद्रावरील कारकुनाने किंवा शिपायाने आणावयाच्या. पूर्वी मुलांना ओळखपत्रे नव्हती आता ते बंधनकारक झाले आहे. का ? तर एकाच्या नावावर दुसरा परीक्षेला बसतो म्हणून. पण आज काही कलाशिक्षकच आपल्या विद्यार्थ्यांच्या कामावर हात फिरवतात त्याचे काय? त्याला पायबंद कसा घालणार? कलानिरिक्षक एरवीही येत नाहीत. खरे तर निदान दोन ते तीन वर्षातून एकदा शालेय तपासणी व्हायला हवी. ती सुद्धा नुसती स्टिल लाईफची भांडी किती? डेड स्टॉक रजिस्टर यापुरती मर्यादित न राहता हा विषय शालेय स्तरावर नीट शिकवला जातो किंवा नाही? या विषयाची साधन सामग्री कलाशिक्षकांना मिळते किंवा नाही? संदर्भासाठीची पुस्तके मिळतात की नाही? याबद्दल चौकशी व्हावी कारण कित्येक शाळांत गतवर्षी चित्रकलेचे साहित्यच मिळाले नाही. कारण विचारले असता समजले ग्रँट नाही. मग बाकी विषयांचे साहित्य कुणाच्या खिशातून मिळाले?

कलाक्षेत्रातील ही परिस्थिती अशीच राहिली तर निकटच्या भविष्यकाळात हा विषय कालबाह्य ठरण्याची शक्यता आहे. त्याचे दुष्परिणाम या देशातील गौरवशाली कलापरंपरेचा गळा घोटाण्यात होतील.

**मंजिरी दांडेकर**
मधु-मिलिंद बिल्डिंग, घंटाळी रोड
नौपाडा, ठाणे (प)४००६०१.
दूरध्वनी क्रमांक : २५४१ ४५३९


# परिसर वार्ता

## डॉ. वा. ना. बेडेकरांचे शिल्प युवा पिढीला स्फुर्तिदायक ठरेल

*कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या पुतळ्याचे मंडळाच्या वर्धापन दिनी माननीय श्री. वि. करंदीकर यांच्या हस्ते अनावरण झाले. वि. प्र. मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडकर यांनी संवाद साधला. - संपादक*



"ठाण्यात आदर्शवत ज्ञानद्वीप उभे करणाऱ्या डॉ. वा. ना. बेडेकर यांचे प्रतीक शिल्प युवा पिढीला स्फूर्तिस्थान ठरेल." असे भावपूर्ण उद्‌गार ख्यातनाम शिल्पकार भाऊ साठे यांनी काढले. विद्या प्रसारक मंडळाच्या "ज्ञानद्वीप" प्रांगणात डॉ. वा.ना. बेडेकरांच्या प्रतीक शिल्पाच्या अनावरणप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात शिल्पकार म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद करंदीकर यांच्या हस्ते प्रतीक शिल्पाचे अनावरण करण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर कार्यवाह श्री. उत्तम जोशी आणि वास्तुरचनाकार श्री. वसंतराव पानसरे, प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह. प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, प्राचार्य दिलीपकुमार नायक, डॉ. जी.व्ही कुलकर्णी, श्री. अनिल चौबळ, श्रीविद्या जयकुमार, सौ. सविता केळकर, सौ. तेजस्विनी तेलंग, श्री. स. वा. गोखले आणि संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



प्रतीमा शिल्पाविषयी भूमिका स्पष्ट करताना भाऊ साठे म्हणाले "शिल्प बनविताना अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. दिवसरात्र विचार केल्याशिवाय पाहिजे तसे शिल्प घडविता येत नाही. मार्बलपासून ब्रॉझपर्यंत अनेक धातूमध्ये मी अनेक शिल्पे घडविलेली आहेत. परंतु माझ्या ८० व्या वर्षात मनाला समाधान देईल असे पाषाणातून शिल्प निर्माण करण्याचे कार्य विद्या प्रसारक मंडळीच्या जाणकार व्यक्तींमुळे झाले. समाजाच्या विविध स्तरात आपले स्थान कायम राखून शिक्षणाच्या पवित्र क्षेत्रात आपले आयुष्य वेचणाऱ्या डॉ. वा. ना. बेडकर प्रतीक शिल्प म्हणजे एक आव्हान होते. नेहमीच्या शैलीत शिल्प घडविणारे अनेक आहेत. त्यामुळेच शिल्पकलेची व्हावी तेवढी प्रगती झाली नाही. दोन वर्षाच्या अथक परिश्रमातून

डॉ. बेडेकरांचे मनाला भावणारे शिल्प आकारास आले. पुढच्या अनेक पिढ्या त्यांच्याकडून स्फूर्ती घेतील असा मला विश्वास वाटतो, वास्तुविशारद वसंतराव पानसरे यांनीही प्रतीक शिल्पामागील आपल्या संवेदना प्रगट केल्या. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी संवाद साधला.

विद्या प्रसारक मंडळाच्या विविध संस्थांच्या अहवालाचे वाचन संस्था प्रमुखांनी केले. गुणवत्ता यादीत

आलेल्या तसेच विविध परीक्षांमध्ये उज्ज्वल यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद करंदीकर यांना संस्थेतर्फे मानपत्र, शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

''निस्वार्थी कार्यकर्त्यांमुळेच संस्था उभ्या राहतात'' असे सांगून श्रीपाद करंदीकर म्हणाले, संस्थेने माझा जो सत्कार केला त्यामुळे मी भारावून गेलो आहे. डॉ. वा. ना. बेडेकर यांनी पाठीवर विश्वासाचा हात ठेवून शिक्षणाच्या चळवळीत मला येण्यास सांगितले. त्यांच्या पावलावर पाऊल टाकून प्रत्येकवेळी संस्थेच्या उत्कर्षाच्या विचार केला. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व शाखांनी सर्वच क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविलेला आहे. संस्थेच्या सर्व कार्यकर्त्यांना डॉ. वा. ना. बेडेकरांनी दिशा दाखविली. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊनच माझ्यासारखे कार्यकर्ते उभे राहिले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रा. कीर्ती आगाशे यांच्या स्वागतगीताने झाली. श्री. स.वा. गोखले यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल भावड यांनी केले.

## मानपत्र

### माननीय श्री. श्रीपाद विनायक करंदीकर

विद्या प्रसारक मंडळाच्या कार्याचे अवलोकन करताना

इवलेसे रोप लावियले दारी
तयाचा वेलू गेला गगनावरी

या ज्ञानेश्वरमहाराजांच्या उक्तीची सार्थ प्रचीती येते. या संस्थेच्या विकासात आपला मोलाचा सहभाग आहे हे नमूद करताना या गौरवप्रसंगी आम्हाला अभिमान वाटत आहे.

१९४४ साली नागपूर बोर्डातून आपण मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालात व १९६७ साली पुणे विद्यापीठाची बी.ए. पदवी प्राप्त केली. आपला व विद्या प्रसारक मंडळाचा संबंध चार दशकांहून अधिक काळाचा. १९५६-५७ साली कार्यकर्ता म्हणून आपला मंडळाशी संबंध आला. रेल्वे व खाजगी कंपनीत आपण नोकरी करीत असतानाच निष्ठेने कार्य करीत राहिलात. १९७६ पासून सभासद म्हणून मंडळाच्या कार्यकारिणीत आपला समावेश झाला. त्यानंतर गेली तीस वर्षे मंडळाच्या कार्यकारिणीत आपण विविध पदे भूषविली. २००४ पासून आपण या संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष आहात.

विविध पदांवर आपण मन लावून कार्य केलेत, पण कोणत्याही पदाचा मोह आपणास नव्हता. 'कार्यकर्ता' ही आपली भूमिका पूर्वी होती व आजही आहे. आपला अनुभव, ज्ञान आणि व्यासंग यांचा संस्थेला जास्तीत जास्त फायदा करून देण्यासाठी आपण तळमळीने कार्यरत आहात. अनेक महत्त्वाच्या प्रसंगी मंडळाला आपण मोलाचे मार्गदर्शन केले व साथ दिली. यापुढेही तशीच साथ मिळेल हा विश्वास आहे.

'माझा मीच घडलो' या आपल्या आत्मचरित्रात कृतज्ञतेने या सहवासाचा उल्लेख आपण केला आहे. स्वयंशिस्त, लोकसंग्रह, परोपकारी वृत्ती यामुळे मंडळाला आपण आदर्शवत् आहातच, पण मंडळाच्या सर्व विभागामधील सर्वांसाठीच आपला वडीलधारा आदर्श महत्त्वाचा आहे. आपल्याला उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

आपल्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करण्यासाठीच हे मानपत्र आपणास प्रदान करण्यात येत आहे.

डॉ. विजय बेडेकर
विश्वस्त, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे.

दि. : १ ऑगस्ट २००६

## विद्या प्रसारक मंडळाने केलेल्या गौरवास उत्तर

विद्या प्रसारक मंडळाने ७१ व्या वर्धापन दिन सोहळ्यात आज माझा सत्कार केला याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. आज वयाच्या ऐंशीव्या वर्षी मागेवळून पहाताना मनात असंख्य आठवणींची मांदियाळी असणे स्वाभाविक आहे. माझे स्नेही कै. अ. धों. टिल्लू व श्री. मोहन पाठक यांच्या मदतीने ''माझा मीच घडलो'' हे आत्मचरित्र डिसेंबर, १९९६ मध्ये मी प्रकाशित केले. त्यात जवळ जवळ सर्व आढावा आला आहेच.

कार्यकर्ता, स्वयंसेवक म्हणून विद्या प्रसारक मंडळाशी माझा १९५६-५७ पासूनचा संबंध आहे. एकीकडे एसीसी मधील नोकरी व दुसरीकडे सामाजिक कार्य चालू होते. कै. डॉ. वा. ना. बेडेकरांनी १९७६ साली माझी विद्या प्रसारक मंडळावर सभासद म्हणून नियुक्ती केली. कार्यकारिणी सदस्य, सहकार्यवाह व कार्याध्यक्ष ही पदे भूषविल्यानंतर जुले २००४ पासून अध्यक्ष म्हणून मी कार्यरत आहे. या ३० वर्षांच्या निकटच्या संबंधात मंडळाच्या अनेक शैक्षणिक वास्तू उभ्या राहिल्या. कार्यक्षेत्र वाढले, विद्यार्थीसंख्या वाढली व मंडळाची आर्थिक स्थितीही उत्तम झाली. माझ्या प्रवेशाच्या वेळी मंडळाची वार्षिक उलाढाल २ कोटी रूपांयाची होती तर ती आता वाढून १६ कोटीपर्यंत झाली आहे.

मंडळाच्या व सर्व शैक्षणिक विभागांच्या लहान मोठ्या सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक व शैक्षणिक कार्यक्रमांना मी जातीने उपस्थित असतो. सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी माझे सलोख्याचे व सौहार्दपूर्ण संबंध आहेत. मंडळाचे व कर्मचाऱ्यांचे संबंध सदोदित सलोख्याचे असावेत तरच संस्थेचे कामकाज नीट सुरळित चालून तिचा उत्कर्ष होतो असा माझा समज आहे. म्हणूनच या बाबतीत यशस्वी झालेल्या टाटा व किर्लोस्कर कंपन्यांचे उदाहरण माझ्या डोळयासमोर असते. कर्मचाऱ्यांच्या सुस्थिती व कल्याणाकरिता बऱ्याच गोष्टी मला करता आल्या. त्यातील उल्लेखनीय बाब म्हणजे विना अनुदानित विभाग व मंडळाच्या कर्मचाऱ्यांकरिता सेवानिवृत्ती उपदान (Gratuity Scheme) तयार करून निवृत्त कर्मचाऱ्यांना ही सुविधा लागू केली. अशा प्रकारची Gratuity Scheme राबवणारी विद्या प्रसारक मंडळ ही महाराष्ट्र राज्यात एकमेव शिक्षण संस्था आहे, ही एक अभिमानाची बाब आहे. या शिवाय मंडळालाही ग्रंथ व यंत्र सामग्रीची देणगी व आर्थिक मिळकतही करून दिली.

आज शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे आणि झपाट्याने होत आहे. या वास्तवाच्या पार्श्वभूमीवर नि:स्वार्थी, कर्तृत्ववान कळकळीच्या कार्यकर्त्यांनी लहानाची मोठी केलेली विद्या प्रसारक मंडळ ही संस्था शैक्षणिक क्षेत्रात जे भरीव काम करीत आहे ते उत्तरोत्तर वृध्दिंगत होणारे व अपवादात्मक आहे. याचा कार्यकर्ता म्हणून मला अभिमान आहे.

जेव्हा मी माझ्या भूतकाळाकडे पहातो तेव्हा माझ्या नजरेस येते की त्यावेळेस माहीत असणाऱ्या तंत्रज्ञानापेक्षा आजचे तंत्रज्ञान झपाट्याने प्रगत होऊन, पुढे गेलेले आहे. संदेशवहनासारखे क्षेत्र असो की व्यवस्थापन शास्त्र, पर्यावरण शास्त्र असो की अवकाश तंत्रज्ञान असो. प्रत्येक क्षेत्रात ज्ञानाची क्षितिजे गेली पाच तपे विस्तारत असलेली मी अनुभवतोय. शिवाय हा विस्तार जागतिक स्तरावर असल्याने आता ''ग्लोबल व्हिलेज'' ही संकल्पना आकार घेत आहे. या काळाच्या बरोबर जाऊन व आजच्या या काळाच्या गरजा ओळखून संस्थांनीही बदलण्याची गरज आहे. विद्या प्रसारक मंडळ त्या दृष्टीने नेहमीच पुरोगामी राहिले आहे. सुरुवातीपासूनच मंडळाचे नशीब इतके शक्तिमान व गुणकारी आहे की त्याला पुढे नेणारे, मेहनत घेणारे नि:स्वार्थी व धडपडणारे कार्यकर्ते लाभले आहेत.

असे नि:स्वार्थी कार्यकर्ते विद्या प्रसारक मंडळात आहेत तसाच दानशूर समाजसेवकांचा पाठिंब्राही मंडळाला आहे. या नवीन काळात कालसुसंगत असा शिक्षणाचा दर्जा टिकविण्यात मंडळ मुळीच कमी पडणार नाही. जोपर्यंत मन व शरीर साथ देत आहे. तोपर्यंत मंडळाचे काम करत राहणे हे माझे ध्येय आहे.

समारोप करताना, आतापर्यंत पुरस्कार प्राप्त असल्याने माझ्याबद्दल उल्लेख असणे साहजिकच होते. या वाटचालीत माझ्याइतकाच किंबहुना अधिक वाटा असणाऱ्या कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांचे माझ्यावर निश्चित ऋण आहे. माझ्या वाटचालीत त्यांचाही मोठा भाग आहे हे मी विसरणार नाही. आपण समारंभपूर्वक असा माझा जो आज गौरव केलात, त्याबद्दल पुन:श्च आभार!

जय हिंद! जय महाराष्ट्र !

**श्री. श्री. वि. करंदीकर**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर
## पूर्व प्राथमिक विभाग

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आषाढी एकादशीला पूर्व प्राथमिक विभागाची दिंडी 'बालपंढरी' या नावाने काढण्यात आली. विठ्ठल - रखुमाई म्हणून मुलांनाच करून विटेवर उभे करतो. दिंडीमध्ये मुले वारकऱ्यांचा पोशाख करतात. तसेच पालखीमध्ये ज्ञानदेवांचा फोटो ठेवून, मुले हातात टाळ घेऊन विठ्ठलाचा नामघोष करतात.

आषाढी अमावास्येला म्हणजेच दिव्यांच्या अवसेला निरनिराळ्या प्रकारचे दिवे जमा करून प्रत्येक दिव्याची माहिती सांगितली, त्यांची छान पूजा करून नैवेद्य दाखवला व मुलांना प्रसाद देऊन हा सण साजरा केला.

नागपंचमीला सर्व शिक्षिका मिळून मातीचे छान वारूळ करून त्यावर धान्य पेरतात. ४-८ दिवस आधीच वारूळ केल्यामुळे पेरलेले धान्य छान उगवते. नागपंचमीच्या दिवशी नागाची प्रतिकृती वारूळावर ठेवून षोडशोपचारे पूजा केली. शिवाय पाटावर नाग व नागकुळे काढून मुलांना प्रत्यक्ष दाखवून सर्व माहिती सांगितली. त्यानंतर शाळेत पुरण करून व मुलांना हा प्रसाद देऊन या सणाची सांगता झाली.

रक्षाबंधनाच्या दिवशी मुली मुलांच्या कपाळाला गंध लावतात व त्यांना औक्षण करून राखी बांधतात. मुलेही तितक्याच हौशीने आपल्या बहिणींना छोटीशी भेट देतात.

गोकुळअष्टमीच्या दिवशी प्रत्यक्ष हंडी सजवून बांधली. पूर्व प्राथमिक विभागातील काही मुले कृष्ण व काही मुली गवळणी बनुन आल्या होत्या. कृष्णाच्या गाणी लावून तसेच 'गोविंदा रे गोपाळा' म्हणत म्हणत दही-हंडी फोडली व मुलांना दही-पोह्याचा प्रसाद दिला.

असे हे सर्व सण साजरे केलेले पाहून नवीन पालकही खूपच खूप झाले. त्यांची त्याबद्दलची प्रतिक्रिया तशीच विशेष होती की, आमच्या घरीही हे सण साजरे केले जात नाहीत, पण शाळेतील या उपक्रमाने आमच्या मुलांना हे सण व्यवस्थित साजरे केलेले बघायला मिळाले व त्यांनी पूर्व प्राथमिक विभागाला धन्यवाद दिले.

आमचा उद्देशच असा आहे की, मुलांना आपल्या संस्कृतीची माहिती व्हावी व त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत. या सर्व उपक्रमांना आमच्या मुख्याध्यापिका सौ. विदुला वैद्य यांचे मोलाचे मार्गदर्शन असते तसेच सहयोगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा सामूहिक प्रयत्नांचा प्रत्यय आपल्याला दिसून येतो.

१ ऑगस्ट ०६ लो. टिळक पुण्यातिथी निमित्त वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली.

**हस्ताक्षर स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| मनाली शाम देशमुख | - | ५ वी |
| तनिषा पांडूरंग देसाई | - | ६वी |
| मृण्मयी प्रकाश कोळी | - | ७वी |
| श्रद्धा अशोक चव्हाण | - | ८ वी |
| पूजा प्रदिप सावंत | - | ९ वी |
| शिशिर राजाराम भोसले | - | १०वी |

वरील विद्यार्थ्यांची निवड झाली तर वक्तृत्व स्पर्धेसाठी

१) श्री हरी पुरुषोत्तम मुळगुंद (५ वी)

२) हेमेश अशोक सावकर (५ वी)

३) शलाका संजय सावंत (७ वी) यांची निवड झाली.

**८ ऑगस्ट ०६**

संस्कार भारती च्या मातृशक्ती विभागातर्फे मंगळगौरी शिबीर आयोजित केले होते. यात इ. ७ वी च्या विद्यार्थिनी व सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला.

'पर्यावरण दक्षता मंचा' तर्फे वृक्षबंधनाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात इ. ६वी चे वर्गशिक्षक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

**१२ ऑगस्ट ०६**

स्काऊट गाइड विभागातर्फे इ. ६वी, ७ वी, ८वी च्या सर्व स्काऊट्स व गाईड्स यांचा सामूहिक रक्षाबंधन कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ. केळकर, पर्यवेक्षिका सौ. कळमकर, श्री. पांचाळ, श्री. जाधव, गाईड कॅप्टन कु. आशालता लोखंडे, सौ. कारंडे-जोशी उपस्थित होत्या.

ब्राह्य सेवा संघ ठाणे तर्फे मार्च २००६ मध्ये घेतलेल्या संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल १००% लागला. निकाल खालीप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| प्रणव फिरके | - ठाण्यात सर्वप्रथम - | गुण ९८ |
| वृषाली फिरळे | - दुसरा क्रमांक - | गुण ९७ |
| नंदकिशोर दळवी | - तिसरा क्रमांक - | गुण ९६ |
| प्राजक्ता शिंदे | - चौथा क्रमांक | गुण ९५ |

**१५ ऑगस्ट ०६**

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते महाविद्यालयांत ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. त्यांच्या हस्ते आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेली हस्तलिखिते व भित्तीपत्रिकांचे प्रकाशन झाले. विषय खालील प्रमाणे होते.

**हस्तलिखिते**

| | |
|---|---|
| इ. ५ वी | दिनविशेष |
| इ. ६ वी | विलक्षण प्राणीजीवन |
| इ. ७ वी | ए. पी. जे अब्दुल कलम |
| इ. ८ वी | स्त्री-शक्ती |
| इ. ९ वी | भारतातील लेणी |
| इ. १० वी | लोकमान्य टिळक |

भित्तीपत्रिका-मराठी आविष्कार : विषय आयुर्वेदातील औषधी वनस्पतींचे उपयोग विद्यार्थ्यांनी आयुर्वेदाचे महत्त्व सांगतांना संस्कृत सुभाषितांची रचना स्वत: केली आहे. मार्गदर्शक शिक्षिक सौ. मीरा लिमये. हिन्दी नवनीत : विषय - रक्षा बंधन मार्गदर्शक शिक्षिक सौ.निर्मल बाय.

इंग्रजी Buds and flowers: विषय - बॉम्ब स्फोटाचे विध्वंसक रुप. मार्गदर्शक शिक्षक श्री. जीवन जाधव

विज्ञान-विज्ञान पत्रिका: विषय- 'फळे खा आणि निरोगी रहा' मार्गदर्शक शिक्षक श्री. प्रविण खैरनार.

**३ ऑगस्ट ०६**

'हिन्दु जागृती मंडळातर्फे' आपल्या शाळेतील ६ वी ७ वी च्या विद्यार्थ्यांनी गणपती अथर्वशीर्षाची २१ आवर्तने पूर्ण केली.

❑❑❑

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### जगण्याचे बळ देण्याची ताकद मातृभाषेतच

'जगाची संपर्क भाषा इंग्रजी असली तरी जगण्याचे बळ देण्याची ताकद मातृभाषेतच असते' असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी, विडंबनकार रामदास फुटणे यांनी केले. जोशी-बेडेकर महाविद्यालयातील मराठी वाङमय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी शुक्रवार दि. ११ ऑगस्ट रोजी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, उपप्राचार्य निलिमा शास्त्री, डॉ. पद्मिनी मूर्ती, मराठी विभागप्रमुख प्रा. दामोदर मोरे उपस्थित होते.

रामदास फुटाणे पुढे म्हणाले, मराठीच्या भवितव्याविषयी चिंता करण्यासारखे वातावरण पसरले आहे. युवकांपुढे आदर्श असावा असे व्यक्तिमत्त्व देशात नसावे हीच शोकांतिका आहे. सर्वच क्षेत्रात इंग्रजीचा प्रभाव वाढत असल्यामुळे मराठी भाषेबद्दल काहींच्या मनात उगाचच न्यूनगंड निर्माण होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रा. दामोदर मोरे यांचा पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा शकुंतला सिंह, प्रा. दामोदर मोरे यांचीही यावेळी भाषणे झाली. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

❑❑❑

## *बा.ना. बांदोडकर-विज्ञान महाविद्यालय*
## प्राचार्यांचा अहवाल
## शैक्षणिक वर्ष २००५ - २००६

प्राचार्यांचा अहवाल हा १ ऑगस्ट रोजी सादर करण्याचा नित्यनियमाचा भाग असला, तरीसुद्धा दरवर्षी हे अहवालवाचन करताना माझी मान अभिमानाने उंच होते, याचे कारण महाविद्यालयाचा उंचावत जाणारा आलेख.

मार्च २००५ चा ११वी चा निकाल ८६.९० टक्के होता, तर मार्च २००६ चा ८९.२७%. मार्च २००५ चा १२ वी चा निकाल ९२.७१% तर मार्च २००६ चा ९८.२६%.

मार्च २००६ मध्ये कु. मंगेश जाधव हा विद्यार्थी ९०.५०% गुण मिळवून महाविद्यालयात पहिला आला, तर कु. मनिष फेगडे ९०.१७% गुण मिळवून दुसरा व अमेय भोसेकर ९०.००% गुण मिळवून तिसरा आला. कु. मोनिका कोरे ही विद्यार्थीनी जिवशास्त्रात १०० पैकी १०० गुण मिळवून महाराष्ट्र बोर्डात प्रथम आली. कु. विमलेश पांड्ये या विद्यार्थ्याने २०० पैकी १९५ गुण मिळवून MHCET परिक्षेत महाराष्ट्रात ३८ वा क्रमांक पटकवला.

मार्च २००५ चा १३ वी चा निकाल ६२.५७% तर १४ वी चा ९१.४८% लागला. मार्च २००६ चा १३ वी चा निकाल ६१.२६% तर १४ वी चा ९२.८३% लागला. १५वी तृतीय वर्ष विज्ञानचा मार्च २००५ चा निकाल ८६.०४% होता, तर मार्च २००६ चा ८९.२०%. इथे मला नमूद करायला आवडेल की मुंबई विद्यापीठाचा तृतीयवर्ष विज्ञानाचा निकाल आहे फक्त ७१.६४% तृतीय वर्ष विज्ञानमध्ये कु. कविता परब ही गणित विषयाची विद्यार्थीनी महाविद्यालयात प्रथम आली (८९%).

मार्च २००५ चा १५ वी चा माहिती व तंत्रज्ञान

विषयाचा निकाल ७१.७४% होता. तर M.Sc चा निकाल ८९%. मार्च २००६ चा १५वी चा निकाल ७९.५५% तर M.Sc चा निकाल ९४.७४%.

महाविद्यालयातर्फे चालवण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मार्च २००५ च्या ग्रंथपाल. परिक्षेचा निकाल ३३.३३% तर पत्रकारिकेच्या अभ्यासक्रमाचा निकाल ९६.५% लागला. मार्च २००६ चा ग्रंथपालन परिक्षेचा ४९% आणि पत्रकारितेचा ७४% लागला.

आपल्या महाविद्यालयातून यावर्षी ४२ विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती तर ८८ विद्यार्थ्यांना फी सवलत मिळाली. जिल्हापरिषदेकडून एकूण १४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फी सवलत मिळाली.

अभिषेक आनेराव या आपल्या ११वी च्या विद्यार्थ्याने तर कमालच केली. AFS intercultural programme या अमेरीकेतील संस्थेच्या सर्व कठिण परिक्षा पास करून १ वर्षाकरता अमेरीकेत राहून शिकण्याची शिष्यवृत्ती त्याने संपादन केली. आता हा विद्यार्थी आपल्याकडे परत ११वीत शिकायला आला आहे.

मार्च २००५ च्या मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेत नितिन कटके या विद्यार्थ्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयात सर्वप्रथम येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल बक्षीस मिळवण्याचा बहुमान मिळवला तर प्रणाली गावकर या प्राणीशास्त्राच्या विद्यार्थीनीने मुंबई विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागात दुसरा क्रमांक मिळवला.

सौ. जयश्री मेनन या डॉ. सौ. महाजन यांच्याकडे प्राणीशास्त्र विषयात Ph.D. करणाऱ्या विद्यार्थीनीस पंडीत भगवानदीन दुबे व रामदुलारी दुबे शिष्यवृत्ती मिळाली. तिच्या संशोधनाचा विषय आहे. 'Bioaccumulation of mercury and a few pesticides, in fish of Thane Creek and its relation to the dietary intake and contaminent levels amongest fish eaters.'

डॉ. रत्नम यांच्याकडे काम करणाऱ्या कु. सुधीर मोहीते या विद्यार्थ्यांस मुंबई विद्यापीठातर्फे रसायनशास्त्र विषयात M.Sc ची पदवी प्रदान करण्यात आली.

विद्यार्थ्यांबरोबरच बांदोडकर महाविद्यालयाचे शिक्षकही विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत. वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मुळगावकर यांना 'Collection, cultivation and conservation of rared and endangered species of orchids from Thane and adjuscent regions' या विषयावर संशोधन करण्याकरता ३५०००/- रु. चे अनुदान मिळाले. डॉ. मुळगावकर यांना मुंबई विद्यापीठातर्फे Ph.D. च्या मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली, तर डॉ. शहा यांना M.Sc. अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली. वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. नागेश टेकाले यांची अमेरिकन बायोग्राफीकल इन्स्टीट्यूट तर्फे त्यांच्या सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे.

आपल्या महाविद्यालयातील वेगवेगळ्या विषयातील शिक्षकांनी २००५-२००६ या वर्षात २२ शोधनिबंध प्रसिद्ध केले तर वेगवेगळ्या ४० कार्यशाळा व चर्चासत्रात भाग घेतला.

आपल्या महाविद्यालयातील इतर शिक्षकही संशोधनक्षेत्रातील चर्चा, परिषदांना हजर राहून स्वत:चे शोधनिबंध प्रसिद्ध करत आहेत. प्राणीशास्त्र विभागाचे प्रो. राठोड व डॉ. कुर्वे यांनी त्यांचे संशोधन पूर्ण करून विद्यापीठाला अहवाल सादर केला, तर डॉ. अठल्ये यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणाऱ्या सौ. रोशन डिसूझा यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करणाऱ्या प्रकल्पास विद्यापीठात प्रथम पारितोषिक मिळाले. सौ. रोशन या स्वत: सोफिया महाविद्यालयात शिकवत असून त्यांच्या

संशोधनाचा विषय होता, "Effect of extract of Lytta vesicatoria, coleoptera on gonads and serological parameters of male albino rat-rattus novergicus albinuss."

आमच्या महाविद्यालयातील ११ ते १५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी संशोधनपर प्रयोग केले. त्यांची संकलित माहिती बंगलोरला NAAC संस्थेला पाठवली गेली. याचबरोबर ठाणे, कल्याण, डोंबीवलीच्या जवळजवळ आठ शाळांना त्यांचे संशोधनपर प्रयोग पूर्ण करण्यास आमच्या महाविद्यालयाने मदत केली.

यावर्षी आपल्या महाविद्यालयात संख्याशास्त्र विभागातर्फे २७ ते २९ सप्टेंबर २००५ या कालावधीत 'Statistics for Non. Statisitians' या विषयावर कार्यशाळा झाली. जवळजवळ ६० संशोधनाचे विद्यार्थी व शिक्षकांनी या कार्यशाळेत भाग घेतला. प्रा. पाटील व संख्याशास्त्र विभागाचे शिक्षक, शिक्षकेतर सहकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. प्राणीशास्त्र विभागाच्या शिक्षकांनी या कार्यशाळेस सहकार्य केले.

महाविद्यालयातील पदार्थविज्ञान विभागातर्फे, "Einstines theories and Present Scenario". या विषयावर १७ ते १९ नोव्हेंबर २००५ या कालावधीत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्रात संपूर्ण महाराष्ट्रातून २५० च्या वर विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. स्वत: प्रा. जयंतराव नारळीकर तीनही दिवस या कार्यशाळेत सहभागी झाले. पदार्थविज्ञान प्रमुख प्रा. गोळटकर, प्रा. मांडगे व इतर विभागाचे सर्वच शिक्षक व शिक्षकेतर सहकारी हे चर्चासत्र उत्तम व्हावे या करता कार्यरत होते.

आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रयोजनेतर्फे २८ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर या कालावधीत १० दिवसांचे राष्ट्रीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात संपूर्ण भारतभरातून ६५० विद्यार्थी व १०० शिक्षक सहभागी झाले होते. डॉ. मोझेस कोलेट, डॉ. सौ. मांजरमकर व छात्रसेनेचे सर्वच विद्यार्थी हे शिबीर व्यवस्थित व्हावे याकरता झटून काम करत होते.

यावर्षी विद्यार्थ्यांकरता 'Stress Management' ताणतणावांशी मुकाबला' तसेच इंग्रजी विषयावरील कार्यशाळा झाली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकरता बदलत्या महाविद्यालयीन वातावरणाशी कसे मिळते जुळते घ्यावे या विषयावर कार्यशाळा झाली. महाविद्यालयातील सर्वात वयाने मोठे अशा श्री. पोद्दारसरांनी शिक्षकांकरता 'शैक्षणिक क्षेत्रातील उत्तम पायंडे' या विषयावर व्याख्यान दिले.

ध्वजदिन निधी संकलन २००४ या योजनेअंतर्गत National Association for the Blind या संस्थेकरता कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यावर्षी रू. ३३०००/- जमा केले.

६ विविध कंपन्यांनी महाविद्यालयात घेतलेल्या मुलाखतींमध्ये २२ मुलांची निवड होऊन ही मुले नोकरीला लागली.

आमच्या महाविद्यालयातील क्रीडा महोत्सव २३ डिसेंबर रोजी झाला. तर कला /सांस्कृतीक कार्यक्रम मनोरंजनाचे कार्यक्रम, मेंदी, रांगोळी, भेटपत्र, छायाचित्र, फुलांच्या रचना, व्यक्तिमत्त्व स्पर्धा व कार्यक्रम ३ ते ५ जानेवारी या दिवसात साजरे केले गेले.

अंतरमहाविद्यालयीन शरीरसौष्ठव स्पर्धेत चि. सूरज वाघमारे या तृतीयवर्षाच्या विद्यार्थ्याने सूवर्णपदक पटकावले व त्याला Mr. University हा किताबही मिळाला.

विद्या प्रसारक मंडळाने आपल्या विनंतीला मान देऊन विज्ञान महाविद्यालयाकरता खास अशी स्टेजची व्यवस्था केल्याने सर्वच विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी या कार्यक्रमाचे मनापासून आस्वाद घेतला. या प्रोत्साहनाकरता आम्ही सर्वच विद्या प्रसारक मंडळाचे आभारी आहोत.

महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्रसेना व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी, विद्यार्थीनींनी विविध ठिकाणी वृक्षलागवड, रक्तदान शिबीर, पाणी आडवणे व जिरविण्याचे विविध उपक्रम, गणपती विसर्जनामध्ये मदत या सारख्या अनेक कार्यक्रमांमध्ये हीरीरिने भाग घेतला, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थीनींनी तर यावर्षी स्पर्धांमधून ३४ बक्षीसे पटकावली.

२६ जुलै २००५ च्या पूर परीस्थितीनंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थांनी हरियाली या संस्थेबरोबर संपूर्ण ठाणे शहराचा अभ्यास केला. या करता MMRDA या संस्थेकडून मदतही मिळाली. जवळजवळ २९०० झाडे लावली गेली, शांतिनगर कल्याण येथे झाडे लावली.

कलामंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये जवळजवळ ४४५ विद्यार्थी सामील झाले. Literary Association तर्फे २५ तर खेळांमध्ये २५० विद्यार्थी सहभागी झाले. वेगवेगळ्या क्षेत्रातील ४२ नामवंत व्यक्ती आमच्या महाविद्यालयात २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात येऊन गेल्या.

आमच्या महाविद्यालयाच्या Website वर आतापर्यंत झालेल्या दोन्ही Conferances ची Proceedings उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे वर्षभरातील सर्वच महत्त्वाच्या घडामोडी आता Website वर दिसू शकतील.

२००५-२००६ या महाविद्यालयीन वर्षात आमची Website जवळजवळ ११ ते १२ लाख लोकांनी बघीतली/उघडली. यावर्षी तर हा आकडा उच्चांक गाठेल कारण संपूर्ण महाराष्ट्रात Online प्रवेशप्रक्रिया करणारी के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतन व आमचे महाविद्यालय ही तीनच महाविद्यालये आहेत.

या सर्वच घडामोडीमधे घवघवीत यश हातात देणारे विद्यार्थी व शिक्षक यांची मी शतश: ऋणी आहे, पण विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यासारखी शिक्षणसंस्था आमच्या पाठीशी आहे म्हणूनच आम्ही हे यश बघू शकतो. त्याबद्दल या संस्थेचे आम्ही सर्वच ऋणी आहोत.

□□□

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (माध्यमिक विभाग) अहवाल शालेय वर्षे २००५-०६

व्यासपीठावरील मान्यवर, व उपस्थित मान्यवर, वि. प्र. मंडळाच्या ७१ व्या वर्धापन दिनानिमित्ताने डॉ. बेडेकर विद्यामंदिर ह्या शाळेची मुख्याध्यापिका म्हणून मी सौ. सविता विनय केळकर शालेय वर्षे २००५-०६ चा अहवाल सहर्ष सादर करीत आहे.

### संस्थेचा वर्धापन दिन

शालेय वर्षात संपुर्ण वर्षाचे शैक्षणिक नियोजन करताना त्या शिक्षण प्रक्रियेशी निगडित सर्व घटकांचा समावेश करावा लागतो. म्हणूनच त्या सर्वांचा ह्यात क्रीयाशील सहभाग असणे अत्यंत जरूरी असते. शाळा केंद्रस्थानी असल्यामुळे शिक्षक, पालक विद्यार्थी समाजातील इतर घटक ह्यांना महत्व आहे. त्या सर्वांचा विचार करून व विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून आम्ही कार्यक्रमाचे व अभ्यासेतर व्याख्यानांचे आयोजन करतो. त्यात माझ्या सहकारी शिक्षकांचे अमोल सहाय्य असतेच प्रमाणेच आपल्या संस्थेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांचा मोलाचा सहभाग व सहकार्य असते. म्हणूनच ही प्रगति शक्य आहे, हे वेगळे सांगायला नकोच. आपण ह्या संस्थेत कार्यरत असणाऱ्या सर्वांनाच त्याचा अनुभव आहे.

अहवाल वाचनाला सुरुवात करण्यापूर्वी ह्या वर्षीची अभिमानास्पद व आनंद देणारी घटना - शालेय वर्षाच्या सुरुवातीच्या महिन्यातच शालान्त परीक्षेचा निकाल

लागला. आपल्या सर्वांनाच-शाळेला, संस्थेला, शिक्षकांना, ठाणे शहराला अभिमान वाटेल असे यश आमच्या विद्यार्थ्यांनीनी संपादन केले.

२००५-०६ ह्या वर्षीही शाळेचा निकाल ९७.३८% लागला होता व १००% निकाल लागलेले विषय- संस्कृत, हिंदी व इंग्लिश.

मराठी माध्यमाच्या शाळेत इंग्लिशचा निकाल १००% लागणे ही विशेष कौतुकाची गोष्ट

तिन्ही विषयाच्या शिक्षकांचे खास अभिनंदन!

इ. १०वी च्या परीक्षेतील यश हे नक्कीच एका वर्षाच्या मेहनतीचे फळ नसून इ. ५वी पासूनच एका ठराविक पद्धतीने विद्यार्थ्यांना त्यांच्या आकलन क्षमतेनुसार मार्गदर्शन द्यावे लागले. मी अत्यंत अभिमानाने सांगू शकते की आम्ही शाळेत विषयावर प्रमुख शिक्षक नेमलेले असतात. ते त्या-त्या विषयाच्या सर्व शिक्षकांना सर्वच बाबतीत मार्गदर्शन करतात. इ.५वी पासूनच विद्यार्थी एका बिशिष्ट शिस्तीने प्रश्नांची उत्तरे लिहितात. ८वीत येईपर्यंत त्यांना त्याचा सराव झालेला असतो.

इ. ९वी, १०वीत इतर गोष्टींवर भर देऊन विद्यार्थ्यांकडून प्रश्नपत्रिका सोडवून घेता येतात. अर्थातच त्याचा परिणाम संपूर्ण शाळेच्या निकालावर होतो.

शालेये वर्ष २००५-०६ आमचा शालांन्त परीक्षेचा निकाला-९७% लागला.

## शालांन्त परीक्षा निकाल २००५-०६

मार्च २००५ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल जून ०५ रोजी लागला. एकूण २७६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी बसले होते. त्यापैकी २६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल ९७.४६% लागला.

- विशेष योग्यता श्रेणी ५७ विद्यार्थ्यांना मिळाली.
- प्रथम श्रेणी ९७ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.
- द्वितीय श्रेणी ८५ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली.

तृतीय श्रेणी ३० विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. संस्कृत, हिंदी, इंग्रजी विषयाची निकाल १००% लागला.

कु. सायली संजीव श्रोती ही विद्यार्थ्यीनी संस्कृत विषयात प्रथम आली. तिला १०० पैकी ९९ गुण मिळाले.

## २००५-०६ या शालेय विर्षात विविध परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश

| अ. क्र. | परीक्षेचे नाव | निकालाची टक्केवारी | विशेष यश |
|---|---|---|---|
| १) | माध्यमिक शिष्यवृत्ती | ८६% | प्रणाव फिरके (जिल्ह्यात १६वा) |
| २) | इंग्रजी-टि.म.वि.प्री.एलि. | ८६% | अशिषेक नेने |
| | एलिमेंटरी | ८७% | कौस्तुभ बांबरकर |
| ३) | गणित ठाणे जिल्हा गणित | | शुभम बहाडकर |
| | अध्यापक मंडळ गणित संबोध -५वी ८वी | ८५% | प्रणव फिरके |
| ४) | गणित प्राविण्य - ५वी | ५०% | शुभम बहाडकर |
| ५) | विज्ञान डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षा मुलाखतीसाठी निवडी इ. ६ वी व ९वी | | प्रफुल्ल खेडेकर (६वी) |
| ६) | राष्ट्रभाषा हिंदी परीक्षा | १००% | ८२ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | संस्कृत शिष्यवृत्ती | १००% | हर्षदा पाठक<br>विनोद नलावडे<br>पूजा कासार<br>प्रांजली नाईक |
| ८) | शासकीय चित्रकला परीक्षा | ७८०% | अखिल माने |
| | एलिमेंटरी ग्रेड परीक्षा | ७३% | स्वातिक पेणकर<br>'अ' श्रेणी |
| ९) | महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा<br>इ. ८वी | निवड झालेल्या विद्यार्थिनी | अनुराधा ओगले<br>स्मिता कोलते |
| १०) | इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा | | |
| | इ. १० वी | ७४% | |
| | इ. ८ वी | ७७% | |
| | इ. ५ वी | ६६% | |
| ११) | महाराष्ट्र राज्य गणित शिष्यवृत्ती परीक्षा | | अद्वैत इनामदार<br>३२०० विद्यार्थ्यांमधून<br>४८ वा क्रमांक |

या व्यतिरिक्त विश्व हिंदू परिक्षेच्या रामायण परीक्षेस व गीता प्रतिष्ठानतर्फे घेतल्या जाणाऱ्या गीताई पाठांतर स्पर्धेसही विद्यार्थ्यांच्या सहभाग असतो.

ह्या आमच्या यशात अर्थातच पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या माझ्या सहकारी सौ. विदुला वैद्य व सौ. कल्याणी वायरे यांचा ही संपूर्ण सहभाग आहे. कारण प्राथमिकचा पाया मजबूत असल्यामुळेच आमची माध्यामिकची उंच इमारत भक्कमपणे उभी आहे.

प्रथम त्या दोन्ही विभागाचा अहवाल सादर करते.

## पूर्व प्राथमिक विभाग-अहवाल
## शालेय वर्ष २००५-०६

पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. विदुला वैद्य ह्यांच्या वतीने मी अहवाल वाचीत आहे-

पूर्व प्राथमिक विभागातील ह्या निरागस मुलांवर उत्तम संस्कार करण्याचे कार्य करण्यात आम्ही सतत कार्यरत असतो. या विभागात विविध उपक्रम साजरे केले जातात व खेळाच्या माध्यामातून आनंददायी शिक्षण दिले जाते.

प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या शिशुची 'बालपंढरी दिंडी' काढण्यात आली. तसेच गुरुपौर्णिमा, रक्षाबंधन, नागपंचमी, श्रावणी शुक्रवार, गोपाळकाला, गणेशोत्सव, भोंडला इ. सण उत्साहाने साजरे करण्यात आले.

या वर्षातील विशेष उपक्रम म्हणजे 'प्राणी जीवन' हा प्रकल्प मांडण्यात आला. यामध्ये (जंगली, पाळीव, पाण्यात राहणारे, सरपटणारे प्राणी, पक्षी, किटक) प्रात्यक्षिक स्वरुपात मांडण्यात आले. लहान वयातच मुलांना प्राणी व पक्षी आपले जीवन कसे जगतात त्याची माहिती करून देण्यासाठी हा प्रकल्प मांडण्यात आला होता. या प्रकल्पाला भरघोस प्रतिसाद मिळाला. ठाण्यातील सर्व शाळांनी ह्या प्रकल्पाला भेट दिली.

ज्याप्रमाणे १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात येतो त्याप्रमाणे मोठ्या शिशुतून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना समारंभ देण्यात आला.

प्रतिवर्षाप्रमाणे मोठ्या शिशु वर्गाची होळी शाळेच्या पटांगणात साजरी करण्यात आली. एक दिवस संपूर्ण रात्र सर्व २५० मुलांना राहण्याच्या व जेवण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. रात्री ८-०० ते सकाळी ६-०० पर्यंत मुले शाळेतच होती. जेवण दुध व बिस्किटे

मुलांना देण्यात आली. जादूगार श्री. माधव धामणकर यांनी होळी प्रज्वलित करून जादूचा कार्यक्रम 'हा खेळ सावल्यांचा' हा शॅडो प्ले चा कार्यक्रम सादर केला. सेवानिवृत्त शिक्षक श्री.प.ग.वैद्य या कार्यक्रमास उपस्थित होते. अशा प्रकारे हसतखेळत होळीचा आनंद पूर्व प्राथमिक विभागातील बालमंडळींनी मनसोक्त लुटला.

## शैक्षणिक अहवाल - प्राथमिक विभाग

सौ. कल्याणी बापरे या प्राथमिक विभागात मुख्याध्यापिका पदावर कार्यरत आहेत. प्राथमिक विभागात २० शिक्षका १ लिपिका व २ सेविका असून विद्यार्थी संख्या ११९८ आहे.

सन २००६-०७ हे शालेय वर्ष शाळेचे अमृत महोत्सवी वर्ष असून त्या निमित्ताने वर्षभर अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्राथमिक विभागाची स्थापना ७ एप्रिल १९३२ गुढिपाडव्याच्या दिवशी झालेली असलेल्या यावर्षी गुढिपाडव्याच्या दिवसाचे औचित्य साधून अमृत महोत्सवी वर्षाचा शुभारंभ धार्मिक कार्यक्रम करून अत्यंत पवित्र वातवरणात साजरा करण्यात आला. या वेळी विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, सर्व विभागांचे प्रमुख, सेवा निवृत्त शिक्षिका, शैक्षणिक क्षेत्रातील इतर मान्यवर, शाळेचे शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी इ. उपस्थित होते.

फेब्रुवारी २००५ मध्ये झालेल्या पुर्व माध्यामिक शिष्यवृती परीक्षेस इ. ४ थी चे ५९ विद्यार्थी बसले होते. परीक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले व शुभम राजन वहाडकर हा जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने व प्रज्ञा प्रकाश पंडित ही जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.

फेब्रुवारी २००६ मध्ये झालेल्या ज्ञानपीठ गणित परीक्षेस आमचे इ. ३ री चे २७२ विद्यार्थी बसले. या परीक्षेत सर्व मुलांना यश मिळाले व कु. प्रणित काळभोर या विद्यार्थीनीला ५० पैकी ५० गुण मिळाले.

शालाबाह्य संस्थातर्फे होणाऱ्या गीता प्रतिष्ठान-गीताई स्पर्धा, संस्कृती कला दर्पण स्पर्धा, संस्कार भारती, स्त्री कल्याण संघटना वक्तृत्व स्पर्धा, प्रबोधनकार ठाकरे चित्रकला स्पर्धा, मावळी मंडळ धावणे स्पर्धा अशा अनेक स्पर्धांमध्ये भाग घेऊन विद्यार्थी अनेक बक्षिसे मिळवितात.

शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या अनेक उपक्रमांसह विद्यार्थ्यांवर धार्मिक संस्कार व्हावेत या दृष्टीनेही प्रयत्न केले जातात. त्याकरीता गुरुपौर्णिमा, आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा, रक्षाबंधन, श्रावणी शुक्रवार, नागपंचमी, दिव्याची अमावस्या, श्री गणेशोत्सव, शारदोत्सव इ. धार्मिक सण व जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण, लोकमान्य टिळक पुण्यातिथी, महात्मा गांधी जयंती, साक्षरता दिन, बालदिन, प्रजासत्ताक दिन, इ. राष्ट्रीय सण साजरे केले जातात.

शासनाने सुरु केलेल्या सर्व शिक्षक मोहिमे अंतर्गत शिक्षक प्रशिक्षण व केंद्र संमेलनात शिक्षक सहभागी होतात. याच योजने अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचे व पुस्तकांचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.

इ. १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांनी पुष्पगंध हे हस्तालिखित तयार केले.

### पुन्हा माध्यामिक विभागाकडे वळू या-

इ. १० वी च्या उत्तम निकालानंतर पुन्हा नव्या जोमाने विद्यार्थ्यांची नवीन बॅच तयार करण्यासाठी अत्यंत उत्साहाने माझे सर्व सहकारी कार्यरत झालेले आहेत. अभ्यासाबरोबरच-

- विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या विषयांचे वाचन करावे. ह्या हेतुने आम्ही विद्यार्थ्यांकडून निरनिराळे विषय देऊन हस्तलिखित लिहून घेतो. त्यात एखादा शास्त्रज्ञ, खेळ, कलाकार, साहित्यिक यांबद्दल हस्तलिखित असते.

त्यात प्रकारे भित्तीपत्रिकाही निरनिराळे विषय देऊन तयार करण्यात येतात.

- गेल्या वर्षीचे विषय- शास्त्रज्ञ आईनस्टाईन, पर्जन्य, विविध कला, भारतीय खेळ व आसने, महाराष्ट्रातील तिर्थस्थाने, नेहरू.
- १० वी च्या विद्यार्थ्यांच्या मनातील ताण त्यांनी कसे दूर करावे. शरीर, मन, बुद्धी यांच्या सर्वांगिण विकासासाठी नियमित, समतोल आहार सकस आहार कसा घ्यावा याबद्दलची व्याख्याने आयोजित करण्यात आली.
- १० वी च्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी बाहेरील तज्ञ शिक्षकांडूनही त्यांना मार्गदर्शन करण्यात आले.
- मराठी वाङमय मंडळाने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्ती झालेल्या कविवर्य विंदा करंदीकरांना त्यांच्या कथांचा कार्यक्रम सादर करून मानाचा मुजरा केला. तर इंग्रजी वाङमय मंडळाने स्वरचित कविता, कथा, विनोद सांगितले. त्यांनी संपूर्ण कार्यक्रम इंग्रजीत सादर केला.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास हेच आमचे ध्येय असल्याने केवळ शालेय स्पर्धा हे ध्येय न ठेवता इतर निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन आम्ही शाळेत करीत असतो.
- शारदोत्सवानिमित्त निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन आम्ही शाळेत करीत असतो. यंदा ठिपक्यांच्या रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते.
- विद्या प्रसारक मंडळातर्फे 'बाळू बाक्रे संगीत' स्पर्धेचे आयोजन केले. त्यात आमच्या शाळेतील गायन स्पर्धेत - श्रद्धा यादव (प्रथम क्रमांक)

तबला वादन - दुर्गेश पितळे (प्रथम क्रमांक)
- प्रणव दांडेकर (द्वितीय क्रमांक)

हार्मोनियम - सुहास भोसले (द्वितीय क्रमांक) पारीतोषिके प्राप्त केली.

- Institute for Promotion of Maths तर्फे घेण्यात आलेल्या गणिताच्या परीक्षेत अद्वैत संजय इनामदार (६ वी) बसला. त्याला २००रु. शिष्यवृत्ती मिळाली. हा विद्यार्थी ३२०० विद्यार्थ्यांमधून ४८ वा आला.
- वन्यजीव सप्ताहानिमित्त, पर्यावरण दक्षता मंचतर्फे निसर्ग मेळावा आयोजित केला होता. त्यांत निरनिराळ्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यांत-

१. चित्रकला स्पर्धा - जीवन चौघुले (द्वितीय क्रमांक)
२. झाडे ओळखा - अजित साळुंखे (द्वितीय क्रमांक)
- निखिल वारघडे (तृतीय क्रमांक)
३. भित्तीपत्रिका - (सौ. मंजिरी दांडेकर - कलाशिक्षिका, द्वितीय क्रमांक यांना पारितोषिके मिळाली.

- 'अँकर' कंपनीतर्फे भरतकाम स्पर्धा आयोजित करण्याच आली.

स्वाती घोंगे - प्रथम क्रमांक
तृप्ती पालनकर - द्वितीय क्रमांक
नम्रता शर्मा - तृतीय क्रमांक
त्यांना पारितोषिके मिळाली.

- श्री मा बालनिकेतन तर्फे विविध गुणदर्शन स्पर्धा घेण्यात आल्या.

मृण्मयी कोळी - पुष्परचना - द्वितीय क्रमांक
पूजा महिंद्रकर - रंगोळी - तृतीय क्रमांक

- 'अभिमान प्रतिष्ठान' तर्फे चित्रकला विज्ञान प्रश्नमंजुषा

घेण्यात आली. नचिकेत भरतु व सुप्रिम पाठारे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिके मिळाले.

- आमच्या विद्यार्थ्यांना खेळामध्येही चांगले यश मिळाले आहे. तालूका स्तरावर १७ वर्षांखाली विद्यार्थ्यांच्या झालेल्या पावसाळी खो-खो स्पर्धेत मुलांच्या व मुलींच्या खो-खो संघानी (द्वितीय क्रमांक) मिळविला.

  १४ वर्षाखालील कबड्डीच्या मुलींच्या संघानी (द्वितीय क्रमांक) मिळविला. हाच संघ नंतर जिल्हास्तरावर वाडा येथे खेळावयास गेला. तेथेही त्यांनी (द्वितीय क्रमांक) मिळविला.

  हर्षला मोरे हिला विशेष गुणांनी गौरविण्यात आले.

- 'घंटाळी क्रिकेटकप' च्या अंतर्गत एक-दिवशीय १५ वर्षाखालील संघाने राबोडी येथील सरस्वती विद्यालयाच्या संघाचा ६१ धावांनी पराभव केला.

**शिक्षक प्रशिक्षण**

- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना आमचे शिक्षकही वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण घेत असतात.

- सर्व शिक्षा अभियान सेवांतर्गत, कृती संशोधन विषयक प्रशिक्षणाला सौ. मिनाक्षी कुमावत, श्री. करमसिंग सोनावणे उपस्थित होते.

- 'पर्यायी उर्जा स्त्रोत' या राष्ट्रीय शिबीरासाठी उपमुख्याध्यापिका सौ. अनुराधा खोपकर, सौ. मिनाक्षी कुमावत, श्री. प्रविण खैरनार, श्री. उमेश शिरापूरी उपस्थित होते.

- न्यु इंग्लिश स्कूल, ठाणे येथे झालेल्या 'पर्यावरण प्रशिक्षण' शिबीरास श्री. प्रकाश पांचाळ उपस्थित होते.

- सर्व शिक्षण मोहिमेच्या अंतर्गत झालेल्या गटसंमेलनास पुढील १० शिक्षक उपस्थित होते.

  सौ. संगीता शिंगाडे, सौ. सावली माने
  सौ. मिनाक्षी कुमावत, सौ. वंदन अडसुळे
  सौ. उज्वल धोत्रे, कु. कल्पना वाघुले
  सौ. जीवन जाधव, श्री. भानुदास गवित
  श्री. दीपक धोंडे, श्री. प्रकाश पांचाळ
  सौ. सुनिता देशपांडे

- सामाजिक बांधिलकी, जपण्याच्या आमच्या शाळेने 'इंडियन रेडक्रॉस सोसायटी' जिल्हा, ठाणे, यांना रेडक्रॉस ध्वज सप्ताहनिमित्त त्यांच्या मदतपेटीत रक्कम जमा करून दिली.

  नॅशनल असोशिएशन फॉर द ब्लाईंड युनिट, या संस्थेला जवळजवळ ११ हजाराच्यावर रक्कम जमा करून दिली.

- किशोर वयीन मुलांमध्ये HIV संबंधीत जागरूकता निर्माण व्हावी म्हणून 'दिशा फाऊंडेशन' तर्फे शिक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात आले. मुलांनी त्यांना सुद्धा ११ हजाराच्यावर निधी जमा करून दिला.

जगात विविध क्षेत्रात क्षणाक्षणाने बदल होत आहेत. याचा अर्थातच समाजावर म्हणजेच मानवी जीवनावर परिणाम होतो. शिक्षण हे समाजप्रणालीचे अविभाज्य अंग असल्यामुळे शिक्षण क्षेत्रावरही ह्या बदलाचा परिणाम होतो अर्थातच. हे बदल स्वीकारले नाहीत तर शिक्षण प्रवाहीत होणार नाही. म्हणूनच प्रचंड वेगाने बदलणाऱ्या घटनांचा स्वीकार करणारी, त्याला सामोरी जाणारी मने शिक्षणप्रणालीतून घडविणे ही काळाची गरज आहे. अर्थातच ह्यासाठी गुणवत्ताधारक, व्यासंगी, शोधकवृत्ती असलेले नवनवीन उपक्रम करण्याची जिद्द चिकाटी असणारे शिक्षक हवेत.

शाळा हे संस्कार केंद्र आहे. म्हणून शाळेचा परिसर रम्य असावा म्हणून वर्षाच्या सुरूवातीला जानेवारीतच नवीन झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेतला जातो.

परिसराप्रमाणेच वर्ग खोल्याही स्वच्छ व सुंदर असाव्यात म्हणून आम्ही वर्गातून लावण्याच्या तक्त्यांचे तीन प्रकारात वर्गीकरण करतो.

१. कायम स्वरुपी तक्ते - ह्यात गणितातील व विज्ञानातील सुत्रे - व्याकरणाचे तक्ते इ.

२. बदलते तक्ते - विषयातील घटकांनुसार व परीक्षांनुसार

३. प्रसंगानुकंप - विद्यार्थांची जिज्ञासा जागृत होऊन त्यांना वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी एखाद्या पाठावरचे संदर्भानुसार कवि किंवा लेखक, पुरस्कारची माहिती इ. त्याचप्रमाणे यंदा आम्ही ५ वी व ६ वी च्या वर्गासमोर व्हरांड्यात पाढे व शहरेव राजधान्या ह्यांच्या पताका करून लावल्या आहेत. येता जाता विद्यार्थ्यांना त्या वाचता याव्यात असे अक्षर त्यामुळे झालेला फायदा विद्यार्थांचे पाढे व राजधान्या पाठ झाल्या. मुद्दाम विद्यार्थांकडून पाठ करून घेण्यापेक्षा मनोरंजनातून पाठांतर असा यशस्वी प्रयोग केला.

शाळा सुविधानी युक्त असली पण अध्यापन कार्यच जर सुयोग्य नसेल तर ती शाळा आदर्श ठरू शकत नाही. कारण अध्यापन हा शाळेचा आत्मा आहे.

ध्येयाने प्रेरीत झालेला शिक्षक वर्ग माझ्या बरोबर असल्यामुळे नवनवीन क्षेत्रात अधिकाधिक यश मिळवून शाळेचे व संस्थेचे नाव उज्वल करण्यात आम्ही सदैव बांधील आहोत.

□□□

पृष्ठ क्र. १७ वरून

**मंगळा गौर जागविण्याच्या निमित्ताने**

आणि नऊवारी साडी किती सुटसुटीत आहे व नेसतानाही निऱ्या घालण्यापासून ते ओच्यापर्यंत व्यायाम कसा आहे हेही प्रात्याक्षिक आमच्यांत झालं. येथेच संस्काराला सुरवात झाली. तेव्हा आपण ''काम्प्युटरवही खेळू व पारंपरिक खेळही खेळू'' - असे ठरवून ''तुझी आई मोठी का माझी आई मोठी'' या खेळाच्या उंचच उंच उड्या मारत, एकमेकींबरोबर फेर धरत, तालासुरांत नाचत आमचा आनंद द्विगुणित होत होता. हा ''निर्मळ आनंद'' आम्ही लुटत होतो. हीच आपली ''शक्ती'' शेवटी पूजा म्हणजे तरी काय? स्वत:चे 'मी' पण विसरणे, आपला 'आंनद' आपल्यातच आहे हे समजणे, द्वैताचे अद्वैत होणे हेच ना? ६५-७० वयाच्या आज्यां-पणजींच्या गाणी म्हणण्याचा उत्साह, सर्व वयाच्या सख्यांना नाचगाण्यातील जल्लोश, घरी फोनचे सारखे खणखणणे, चौकशी करणे हे खूपच उत्साहवर्धक होते व आताची ही उपस्थिती व आपल्या शिबिरातील सहभाग बघून खेळ खेळत खेळता मनापासून म्हणवेसे वाटतय की ''हे जीवन सुंदर आहे. खरोखरी सुंदर आहे!

असाच अनुभव आपल्या सर्वांना वरचेवर येऊ दे ही परमेश्वराकडे प्रार्थना.

**सौ. सुमेधा बेडेकर**
शिवशक्ती, महर्षी कर्वे पथ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५४२ १४३८